www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ५१ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, २९ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### हिवताप आणि डेंग्यूचे मुंबईत सर्वाधिक रुग्ण, दोन वर्षांत रुग्णसंख्येत मोठी वाढ

● मुंबई, दिगंबर जाधव :

पावसाळा सुरू झाल्यानंतर हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत नेहमीच वाढ होत असली, तरी वर्षभर या आजारांचे रुग्ण सापडत असतात. गेल्या सहा महिन्यांत राज्यात आढळलेल्या हिवताप व डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण मुंबईत आढळून आले आहेत. या काळात शहरात हिवतापाचे १ हजार ९४६ तर डेंग्यूचे ३८९ रुग्ण सापडल्याने मुंबईकरांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पान २ वर

### दिल्ली विमानतळावर छत कोसळून एकाचा मृत्यू



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

राजधानी दिल्लीत काल रात्रीपासून मुसळधार पावसाची सुरुवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा कडाका आणि पाण्याची टंचाई सोसत असलेल्या दिल्लीकरांसाठी ही आनंदाची बातमी असली तरी मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पडझडीच्या घटना घडत आहे. दिल्ली विमानतळाच्या टर्मिनल १ येथील छत कोसळून एकाचा मृत्यू, तर तीनजण जखमी झाल्याची माहिती दिल्ली अग्निशामक विभागाकडून देण्यात आली आहे. पान २ वर

### थापांचा नाही, मायबापांचा अर्थसंकल्प; देवेंद्र फडणवीसांचे उद्धव ठाकरेंना प्रत्यूत्तर



● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई - राज्य सरकारने आज अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये महिला, शेतकरी, तरुणांसाठी मोठमोठ्या घोषणा करण्यात आल्या. यावरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हा थापांचा अर्थसंकल्प असल्याची टीका केली होती. पान २ वर

## ईडीकडून मुंबई आणि जौनपूरमध्ये मालमत्ता जप्त; ४.१९ कोटींची स्थावर मालमत्ता जप्त



● मुंबई, दिगंबर जाधव :

मुंबई : सक्तवसुली संचलनालयाच्या (ईडी) मुंबई विभागीय कार्यालयाने मुंबई आणि उत्तर प्रदेशमधील जौनपूर शहरात जमीन, निवासी सदनिका आणि व्यावसायिक इमारती अशी स्थावर मालमत्ता गुरुवारी (२७ जून) तात्पुरती जप्त केली. ही सुमारे ४.१९ कोटींची मालमत्ता आहे. आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) ही कारवाई करण्यात आली. अशोक कुमार सिंग, आशिष कुमार सिंग, सदाशिव (मेहुल पांडे) आणि जनार्दन पांडे यांनी त्यांच्या लाभार्थी मालकीच्या कंपनीद्वारे केलेल्या बँक फसवणूक प्रकरणात ईडीकडून ही कारवाई केली.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या तक्रारीच्या आधारे आयपीसी कलम १८६० च्या कलमांतर्गत केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), आर्थिक गुन्हे विभाग (ईओडब्ल्यू), मुंबई यांनी नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने तपास सुरू केला. सेंट्रल बँक ऑफ इंडियाने मेसर्स अशोका प्रॉपर्टी डेव्हलपर्स, अशोक कुमार सिंग, आशिष कुमार सिंग आणि इतरांच्याविरोधात ही तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी सीबीआयकडून आरोपपत्रही दाखल करण्यात आले आहे. मेसर्स अशोका प्रॉपर्टी डेव्हलपर्सचे मालक अशोक कुमार सिंग आणि आशिष कुमार सिंग यांनी मेहुल पांडे, जनार्दन पांडे आणि इतरांच्या संगनमताने बनावट आणि गुन्हेगारी कट रचून बँक फसवणूक केल्याचे ईडीच्या तपासात उघड झाले आहे.

# अर्थसंकल्पात घोषणांचा पाऊस

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई : राज्याच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी राज्य सरकारने अर्थसंकल्प (Budget) सादर केला असून विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या घोषणा यंदाच्या बजेटमध्ये करण्यात आल्या आहेत. महिला वर्गांना खुश करण्याचा प्रयत्न या बजेटमधून करण्यात आला असून गेल्या 2 दिवसांपासून चर्चा होत असलेल्या 'लाडकी बहिण योजनेची' घोषणाही उपमुख्यमंत्री अजित पवार (Ajit Pawar) यांनी अर्थसंकल्प सादर करताना केली. यासह अर्थसंकल्पात कोण-कोणत्या महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या, याची संपूर्ण माहिती या खाली देण्यात आली आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

राज्यात लेक लाडकी योजनेसह महिलांना आर्थिकदृष्ट्या मदत करण्यात येत असून नव्या योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू होत असून बजेटमध्ये महिलांसाठी विविध योजना सुरू होणार असल्याची घोषणा करण्यात आली. या योजनेंतर्गत राज्यातील 21 ते 60 वर्षांतील महिलांना दरमहा 1500 रुपये देमार.

वारीच्या प्रतिदिंडीस 20 हजार रुपयांचा निधी

संत श्री तुकाराम महाराजांचं नाव घेत अजित पवारांनी अर्थसंकल्पाची सुरुवात केली. मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली. तसेच, वारीसाठी पंढरीकडे प्रस्थान करणाऱ्या नोंदणीकृत दिंड्यांना, प्रतिदिंडी 20 हजार रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. तसेचस, वारीचा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठवण्यात येणार असल्याचेही घोषित केले.

राज्यातील व्यावसायिक शिक्षणात मुलींची संख्या वाढवण्यासाठी सरकार कटिबद्ध असून अभियांत्रिकी, वास्तूशास्र, वैद्यकीय तसंच कृषीविषयक अभ्यासाठी प्रवेशीत 8 लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना शिक्षणशुल्क आणि परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. पान २ वर

### शेतकऱ्यांना प्रती हेक्टर 5 हजार रुपयांचं सहाय्य, वीज बिल माफ

राज्यातील 40 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर असल्याचे सांगत ई पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू केली आहे. शेतकऱ्यांना 1 रुपयांत पिक विमा देण्याची योजना कायम असणार आहे. तर, गाव तिथे गोदाम योजना राबवण्यात येत आहे. जुन्या गोदामांची डागडुजी करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच राज्यातील कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रतीहेक्टर 5 हजार रुपयांचं अर्थसहाय्य मिळणार आहे. राज्यातील शेती कृषी पंपाचे सर्व थकित बील माफ करण्यात आल्याचेही अजित पवारांनी सांगितले.

## राज्याच्या अर्थव्यवस्थेत ७.६ टक्क्यांची वाढ अपेक्षित

### अजित पवारांकडून महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल सादर

● मुंबई, दिगंबर जाधव :




मुंबई : महाराष्ट्राच्या विधानसभेचं पावसाळी अधिवेशन आजपासून (२७ जून) सुरू झालं आहे. दरम्यान अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आर्थिक वर्ष २०२३-२४ चा महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला. या अहवालानुसार महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ७.६ टक्क्यांनी वाढेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.तर देशाच्या अर्थव्यवस्थेतही ७.६ टक्क्यांची वाढ होण्याची अपेक्षा आहे. राज्याच्या कृषी तसेच कृषीपुरक क्षेत्रातही १.९ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे.

या आर्थिक पाहणी अहवालानुसार, राज्याच्या कृषी व संलग्न क्षेत्राचा एकंदरीत विचार करता पिकांच्या विभागात १.५ टक्के घट होऊ शकते, असं म्हटलं आहे. तर, वनसंवर्धनात ९.२ टक्के, मासेमारी व जलसंवर्धनात २.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. उद्योग क्षेत्रात ७.६ टक्के, वस्तू निर्मिती क्षेत्रात ७.५ टक्के, बांधकामात ६.२ टक्के, राज्याच्या व्यापार, दुरुस्ती, हॉटेल्स व उपहारगृहे, वाहतूक, साठवण व दळणवळण, तसेच प्रसारणाशी संबंधित सेवा क्षेत्रांत ६.६ टक्के, वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवांमध्ये १०.१ टक्के वाढ अपेक्षित आहे, सार्वजनिक प्रशासन, सुरक्षा व इतर सेवांमध्ये ७.६ टक्के, तर सेवा क्षेत्रात ८.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. पान २ वर

## आणीबाणी हा देशाच्या इतिहासातील काळा अध्याय; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची टिप्पणी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

लोकसभाध्यक्षांनंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही गुरुवारी संसदेच्या दोन्ही सदनांतील सदस्यांसमोर केलेल्या अभिभाषणामध्ये 'आणीबाणी हा देशाच्या इतिहासातील काळा अध्याय आहे', अशी मार्मिक टिप्पणी केली. संसदेमध्ये सलग दुसऱ्या दिवशीही संविधानाच्या मुद्द्यावरून अभिभाषणाच्या निमित्ताने केंद्र सरकारने काँग्रेसला घेरण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये संसदेत तसेच, संसदेबाहेरही काँग्रेस विरुद्ध भाजप असा आक्रमक लढाई रंगण्याची शक्यता मानली जात आहे.



'आज २७ जून आहे. २५ जून १९७५ रोजी लागू करण्यात आलेली आणीबाणी हा संविधानावर थेट हल्ल्याचा सर्वात मोठा व काळा अध्याय होता. त्यानंतर संपूर्ण देशात हाहाकार माजला होता. पण, अशा असंवैधानिक घटनांवर देशाने विजय मिळवून दाखवला. भारताला प्रजासत्ताकाची मोठी परंपरा असल्याने आणीबाणीविरोधात यशस्वी लढा देता आला', असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. पान २ वर

## झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अखेर जामीन मंजूर

● झारखंड, प्रगती शर्मा :



झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरने यांना झारखंडज उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. आंचल जमीन घोटाळा प्रकरणात हायकोर्टाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणाची सुनावणी १३ जून रोजी पूर्ण झाली होती. त्यानंतर न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. न्यायमूर्ती रंगन मुखोपाध्याय यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण होते. ईडीने रांचीमध्ये लष्कराच्या ताब्यात असलेल्या ४.५५ एकर जमिनीच्या बेकायदेशीर खरेदी-विक्रीची चौकशी सुरू केली. या प्रकरणी ईडीनं रांचीच्या बडागाईन झोनचे महसूल उपनिरीक्षक भानू प्रताप प्रसाद यांना अटक केली होती. त्यांच्या राहत्या घरातून मोठ्या प्रमाणात सरकारी कागदपत्रं आणि मोबाईलही त्यावेळी जप्त करण्यात आले होते. पान २ वर

## बेकायदा पब, बारवर हातोडा; मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर ठाणे महापालिकेची अतिक्रमणविरोधी मोहीम तीव्र




● ठाणे, विशाल पाटील :

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर ठाणे महापालिका प्रशासनाने गेले अनेक वर्षे बिनदिक्कत सुरू असलेल्या शहरातील अनधिकृत पब, बार आणि अमली पदार्थांशी संबंधित अवैध बांधकामांवर गुरुवारी हातोडा टाकला. दिवसभरात अनेक बार आणि अमली पदार्थाची विक्री होत असलेली बेकायदा बांधकामे पालिका प्रशासनाने जमीनदोस्त केली. बेकायदा पब आणि बारचे केंद्र असलेल्या घोडबंदरच्या कोठारी कम्पाऊंड परिसरातही पालिकेने कारवाई केली. मात्र, काही बार आणि पबची केवळ बाहेरील शेड तोडण्यात आली.

ठाण्यातील बेकायदा हॉटेल, पब, हुक्का पार्लर आणि डान्स बारचा मुद्दा अनेकदा चर्चेत आला. तत्कालीन आयुक्त संजीव जयस्वाल यांच्या कार्यकाळात शहरातील बेकायदा हॉटेल, पब, हुक्का पार्लर आणि ऑर्केस्ट्रा बारची बांधकामे तोडण्यात आली. पान २ वर

## तुतारी, टाळ मृदंगाचा निनाद अन् विण्याचा झंकार; लाखो वैष्णवांचा मेळा, तुकोबा निघाले विठुरायाच्या भेटीला

● देहूगाव, अभिजित येरल्लू :



वैष्णवांचा कैवारी आणि वारकरी संप्रदयाचे श्रध्दास्थान असलेले जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या 339 व्या पालखी सोहळयाचे शुक्रवारी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास पंढरपुरकडे प्रस्थान ठेवले. हा वैष्णवांचामेळा भक्तीसागराच्या रुपात सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास पंढरपूरकडे मार्गस्थ झाला. सकाळ पासुन ढगाळ हवामान व अधुन मधुन येणाऱ्या पावसाच्या हलक्या सरी आनंदाने अंगावर घेत अत्यंत उत्साही आणि प्रसन्न भक्तीमय वातावरण जलाभिषेक करीत वैष्णवांचे दैवत असलेल्या पांडूरंगाच्या भेटीला जाण्यासाठी तुतारी, टाळ मृदंगाच्या निनाद, विण्याचा झंकार करीत वारकरी मुक्तपणे ध्येयभान हरखून विविध पाऊलांसह फुगड्या खेळत आनंद व्यक्त करीत होते. पान २ वर

# बालेकिल्ल्यातच पिछेहाट, विधानसभा निवडणुकीत हितेंद्र ठाकूर यांच्यासमोर आव्हान

● मीरारोड, विशाल पाटील :

वसई– लोकसभा निवडणुकीत बहुजन विकास आघाडीचा पराभव तर झालाच परंतु बालेकिल्ला असलेल्या वसई, नालासोपारा आणि बोईसर या ३ मतदारसंघात पिछेहाट झाली आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत बविआला महाविकास आघाडीची आणि महायुतीच्या तगड्या आव्हानांचा सामना करावा लागणार आहे.

पालघर लोकसभा मतदारसंघातील ६ विधानसभा मतदारसंघांपैकी वसई, नालासोपारा आणि बोईसर या मतदारसंघात बविआचे वर्चस्व आहे. २००९ मध्ये बहुजन विकास आघाडीचे बळीराम जाधव हे खासदार म्हणून निवडून आले होते. तर २०१९ च्या निवडणुकीत बविआला ४ लाख ९१ हजार मते मिळाली होती. गेल्या काही वर्षात बविआने पालघर जिल्ह्यात आपल्या पक्षाचा विस्तार केला होता. त्या जोरावर यंदा बविआने बोईसरचे आमदार राजेश पाटील यांना मैदानात उतरवले होते. जिल्ह्यातील विक्रमगड, डहाणू आणि पालघरमधून फार मतांची अपेक्षा नव्हती. परंतु वसई, नालासोपारा आणि बोईसर या मतदारसंघात प्रचंड मताधिक्य घेऊन विजयी होऊ, अशी रणनिती पक्षाने आखली होती. त्यासाठी जोरदार प्रचार केला होता. पान २ वर



### तिरंगी लढतीचे आव्हान?

■ बविआने कुठल्याही धर्म आणि जातीचे राजकारण न करता विकासकामे हा केंद्रबिंदू ठेवला होता. त्यामुळे सर्व धर्मियांची पक्षाला साथ होती. भाजप-सेनेच्या जातीयवादी राजकारणामुळे मुस्लिम-दलित मते हा बविआकडे हक्काची मतपेढी होती. वसईतील ख्रिस्ती थेट बविआकडे नसले तरी कॉंग्रेसच्या माध्यमातून ते बविआला साथ देत होते. २०१९ च्या निवडणुकीत बविआसोबत असणारी कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) आणि माकप हे पक्ष यंदा महाविकास आघाडीसोबत होते. त्यामुळे बविआला २०२९ च्या निवडणुकीत ४ लाख ९१ हजार मते मिळाली होती. या लोकसभा निवडणुकीत नव्याने तयार झालेले महाविकास आघाडीचे समीकरण केवळ वसईत नव्हे तर राज्यात यशस्वी ठरले आहे. मुस्लिम, दलित आणि ख्रिस्ती मतदारांनी महाविकास आघाडीला साथ दिली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने जोरदार पणे लढण्याची तयारी केली आहे. दुसरीकडे महायुतीने आधीपासून मतदारसंघ बांधून अप्रत्यक्ष प्रचाराला सुरवात केली आहे. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत तिरंगी लढत होण्याची शक्यता असून बविआला ते आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. मागील विधानसभा निवडणुकीत बोईसर मतदारसंघात बविआच्या राजेश पाटील यांचा निसटता विजय झाला होता तर नालासोपारामध्ये क्षितीज ठाकूर यांना सर्व ताकद पणाला लावावी लागली होती. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत बविआला बालेकिल्ला राखणे फार सोपे नसणार आहे. मात्र बविआ विधानसभेच्या विजयाबाबत ठाम आहे.

## दिव्यातील फुटपाथ फेरीवाल्यांनी व्यापले,ठाणे महापालिकेच संपूर्ण दुर्लक्ष...

● ठाणे, सुचित शिंदे :

दिव्यात मुंब्रा देवी कॉलनीतील रस्त्यावर प्रशस्त फुटपाथवर फेरीवालांनी बस्तान मांडले आहे. ठाणे महापालिकाच्या गाईडलाईननुसार महापालिका प्रशासनाने तयार केलेल्या प्रशस्त फुटपाथवर फेरीवाल्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना चालणे मुश्किल झाले आहे. ठाणे महापालिकेचा पथ विभाग आणि अतिक्रमण विभाग यांच्या दुर्लक्षामुळे अतिक्रमणाचा विळखा वाढत असून यावर कारवाई करण्याची मागणी दिवेकर नागरिक करीत आहेत. मुंब्रादेवी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी प्रशस्त पदपथ असून ठिकठिकाणी उभे फलक, सायकल




ट्रँक , कपडे घातलेले पुतळे तसेच अन्य अनेक वस्तू दुकानदार फुटपाथवर ठेवत असून दिवा वासियांना चालणे देखील जिक्रीचे झाले आहे.दिव्यातील सर्वच मार्गावर सध्या अनधिकृत फेरीवाले आपले ठाण माडून बसल्याने त्याची संख्या हजाराच्या वर गेली आहे. या फेरीवाल्यांनी संपुर्ण फुटपाथ अड़विल्यामुळे पादचाऱ्यांना चालायला ही जागा शिल्लक राहीलेली नाही. तसेच आपला धंदा होण्यासाठी ते मोटार सायकल आडवी लावत होते. त्यामुळे रस्त्यावर प्रचंड वाहतुक कोंडी तर दुसरीकडे फेरीवाल्याच्या समोर ग्राहकांची जमलेली गर्दी या सर्वामुळे पादचाऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. पान २ वर

## संपादकीय

# शेख हसीनांच्या भारत-भेटीने काय साधले?

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना या दोन दक्षिण आशियाई शेजारी देशांच्या सरकारप्रमुखांनी आपापल्या तिसऱ्या कार्यकाळात सहकार्यांचा संवाद आणखी पुढे नेला. पंतप्रधान शेख हसीना या २१ व २२ जून रोजी भारतात आल्या होत्या. सात नवीन करार आणि तीन करारांचे नूतनीकरण अशा १० सामंजस्य करारांवर या भेटीत स्वाक्षऱ्या झाल्या. या भेटीच्या पैलूंची चर्चा करणे, या लेखाचा उद्देश आहे.

आर्थिक संबंधः उभय देशांमधील आर्थिक संबंधांत वाढ झाली असून द्विपक्षीय व्यापार २०२३ मध्ये १५.९ बिलियन डॉलरपर्यंत पोहोचला आहे. यात वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, कृषी आणि बरेच काही समाविष्ट आहे. बांगलादेशची भारताशी दोन अब्ज डॉलरपर्यंतचे व्यवहार रुपयांत करण्याची मुभा असल्यामुळे त्या देशाच्या परकी चलन साठ्यावरील ताणही कमी होऊन, सुरळीत व्यापाराला चालन मिळते. या भेटीत झालेल्या नवीन करारांमुळे भारत-बांगलादेश डिजिटल भागीदारीसाठी सामायिक दृष्टीकोन, विशेषतः, उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि डिजिटल अर्थव्यवस्थांमध्ये सहकार्य वाढवणे अपेक्षित आहे. ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि संपर्कसेवा : पायाभूत सुविधा प्रकल्पांची उभारणी सुरू असल्याने भारत-बांगलादेश संपर्क आणि व्यापारसुलभता वाढणार आहे. अखौरा- अगरतळा सीमापार रेल्वे लिंक, भारताच्या ईशान्येला बांगलादेशशी जोडणारा आणि खुलना- मोंगला बंदर रेल्वे मार्ग हे प्रादेशिक वाहतुकीचे जाळे सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम आहेत. रेल्वे संपर्कयंत्रणेबाबत नव्याने स्वाक्षरी झालेल्या सामंजस्य करारामुळे, प्रादेशिक वाहतुकीत आणखी सुधारणा होईल. भारताकडून बांगलादेशला वीज पुरवठाही होतो आहे. २०२३ मध्ये या विजेची निर्यात १,१६० मेगावॅटपर्यंत पोहोचली. आता मैत्री सुपर थर्मल पॉवर प्लांटचे दुसरे युनिटही सुरू होत असल्याने ती आणखी वाढेल. अक्षय ऊर्जा, विशेषतः सौर आणि पवन ऊर्जेमध्येही सहकार्यांच्या संधींची चाचपणी उभय देशांकडून केली जाते आहे. नेपाळमधून बांगलादेशला भारतीय ग्रिडद्वारे ४० मेगावॅट जलविद्युत निर्यात सुरू करणे, हे प्रादेशिक ऊर्जा सहकार्यातील महत्त्वपूर्ण पाऊल आहे. बंगालचा उपसागर आणि हिंद महासागर क्षेत्रात ब्लू इकॉनॉमी आणि सागरी सहकार्यांवरील सामंजस्य करार सागरी संसाधने आणि महासागर आधारित उद्योगांमध्ये सहकार्याला उपकारक ठरतील. सुरक्षाः दोन्ही देशांदरम्यानच्या सीमेची लांबी ४०९६.७० किलोमीटर आहे आणि या सीमेचे व्यवस्थापन विविध द्विपक्षीय यंत्रणांद्वारे केले जाते. दहशतवाद, अतिरेकी आणि आंतरराष्ट्रीय गुन्हे यासारख्या सामान्य आव्हानांना तोंड देण्यासाठी सीमा रक्षक दल आणि नोडल ड्रग्स कंट्रोल एजन्सी यांच्यात नियमित चर्चा होत असते. याखेरीज आता भारताचे 'डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज (डीएसएससी) ' आणि बांगलादेशातील 'डिफेन्स सर्व्हिसेस कमांड अँण्ड स्टाफ कॉलेज (डीएससीएससी)' यांच्यात लष्करी शिक्षण क्षेत्रातील सहकार्यासाठी नव्याने स्वाक्षरी करण्यात आलेल्या सामंजस्य करारामुळे सुरक्षा संबंध अधिक दृढ होतील. प्रादेशिक स्थैर्य आणि सुरक्षा राखण्यासाठी गुप्तचर माहितीची देवाणघेवाण आणि संयुक्त दहशतवादाचा सामना करण्यासाठी सुरू असलेले सहकार्य महत्त्वाचे आहे. यापूर्वी भारताने संरक्षण खरेदीसाठी ५० कोटी डॉलरची पतसुविधा (क्रेडिट लाइन) यापूर्वीच देऊ केलेली आहे. बांगलादेशची संरक्षण क्षमता तर वाढू शकतेच, पण दोघांमधील धोरणात्मक भागीदारी देखील मजबूत होण्यास मदत होईल. तीस्ता पाणी वाटप: भारत सध्या तीस्ता नदीचे ५५ टक्के पाणी नियंत्रित करतो आणि बांगलादेश डिसेंबर - मेच्या कोरड्या हंगामात ५० टक्के पाण्यावर दावा करतो, हा दोन्ही देशांतील तीस्ता पाणी वाटप वादातला कळीचा मुद्दा आहे. दोन्ही देशांनी नदीवर बंधारे बांधून पाणी दुसरीकडे वळवलेले आहे, त्यामुळे भारताच्या हद्दीत पश्चिम बंगालमधील अंदाजे ९,२०,००० हेक्टर तर बांगलादेशातील ७,५०,००० हेक्टर क्षेत्राला सिंचन मिळते.



## आजची चित्रोळी

जनां दाखवून गाजरें
लुबाडताती जगती !
लोभा माणूस भुलतो
ही तर त्याची ख्याती !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### हिवताप आणि डेंग्यूचे मुंबईत सर्वाधिक...

हिवताप व डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य सरकारकडून दरवर्षी विविध उपाययोजना राबविल्या जातात. असे असताना हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. राज्यात गेल्या दोन वर्षांमध्ये हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. हिवतापाचे २०२२ मध्ये १५ हजार ४५१, २०२३ मध्ये १६ हजार १५९ तर यंदा जूनपर्यंत ४ हजार ५२३ रुग्ण सापडले आहेत. यात मुंबईमध्ये सर्वाधिक १ हजार ९४६ रुग्ण आढळले असून त्याखालोखाल गडचिरोलीत १ हजार ६५३, चंद्रपूरमधून २१६ आणि पनवेलमधून १५१ रुग्ण सापडले आहेत. गडचिरोलीमध्ये हिवतापाने तिघांचा मृत्यूही झाला आहे. तर २०२२ मध्ये राज्यात डेंग्यूचे ८ हजार ५७८, २०२३ मध्ये १९ हजार ३४ रुग्ण आढळले होते. यावर्षी आतापर्यंत २ हजार ८०२ रुग्णांना डेंग्यूची लागण झाल्याचे स्पष्ट झाले असून यातही मुंबईतच सर्वाधिक ३८९ रुग्ण आहेत. त्याखालोखाल पालघरमध्ये २२०, नाशिकमध्ये १९८, कोल्हापूरमध्ये १९२, रत्नागिरीत ११७ आणि नांदेडमध्ये १०१ रुग्ण सापडले आहेत. वर्धा जिल्ह्यात डेंग्यूने एकाचा बळी घेतला आहे. जनजागृतीवर भर

राज्यात हिवताप व डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जनजागृती करण्यावर भर देण्यात येत आहे. गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळांच्या माध्यमातून आजारांबाबत माहिती पोहोचवली जाते. प्रभात फेऱ्या, कार्यशाळा, प्रशिक्षण, भित्तीपत्रे, वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून जनजागृती करत असल्याचे आरोग्य सेवा विभागाचे सहसंचालक कैलास बाविस्कर यांनी सांगितले

### दिल्ली विमानतळावर छत कोसळून एकाचा...

जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. टर्मिनलवरून होणारे सर्व उड्डाण पुढील आदेश येईपर्यंत रद्द करण्यात आले आहेत. तसेच सुरक्षिततेच्या कारणास्तव येथील कामकाजही थांबविले गेले आहे. पहाटे ५.३० वाजता विमानतळाकडून छत कोसळल्याचा फोन आला असल्याची माहिती अग्निशामक विभागाने दिली. दरम्यान केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्य म्हटले की, ते स्वतः या दुर्घटनेवर लक्ष ठेवून आहेत. तसेच मदतकार्यासाठी सूचना देत आहेत.

### थापांचा नाही, मायबापांचा अर्थसंकल्प; देवेंद्र...

उद्धव ठाकरे म्हणाले हा थापांचा अर्थसंकल्प आहे. आम्ही म्हणतो की हा थापांचा नाही तर मायबापांचा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज देणारा निर्णय घेणारा, कापूस सोयाबीन उत्पादकांना मदत करणारा, महिलांना योजना आणणारा, तरुणांना रोजगार देणारा अशा प्रकारचा हा अर्थसंकल्प आहे, असे फडणवीस म्हणाले. विरोधी पक्षाचे लोक इथे बोलत होते. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर नूर नव्हता. तो उतरलेला होता. त्यांच्या बोलण्यात जोर नव्हता. हा अर्थसंकल्प महाराष्ट्रात एक नवा इतिहास तयार करणारा आहे. हा अर्थसंकल्प आम्ही पूर्ण करून दाखवू. हा निवडणुकीचा नाही तर निर्धाराचा अर्थसंकल्प आहे, असे उत्तर फडणवीस यांनी दिले. जयंत पाटील किंवा विरोधकांचे नेते बजेटवर काय बोलायचे हे आधीच लिहून आणतात. आम्ही कसाही अर्थसंकल्प मांडला असता तरी ते तेच बोलले असते, असा टोलाही त्यांनी लगावला. यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्यूत्तर दिले आहे. शेतकरी, महिला, युवा मागासवर्गीय अशा सर्व घटकांना समर्पित असा हा अर्थसंकल्प आहे.

### झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना...

या आरोपींनी सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमतानं भूमाफियांच्या नावे फसवणूक करून भूखंड हस्तांतरित केल्याचं तपासात उघड झालं. यानंतर हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली. ३१ जानेवारीपासून ते न्यायालयीन कोठडीत आहेत. आता तब्बल सहा महिन्यांनंतर माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन बाहेर येणार आहेत. हेमंत सोरेन यांच्या अटकेनंतर काँग्रेस आक्रमक झाली होती. अनेक विरोधी पक्षातील नेत्यांनी केंद्रातील सरकारवर तोंडसुख घेतलं. त्यांच्यावर कारवाई झाल्यानंतर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही अटक करण्यात आली. त्यामुळे विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांविरोधात षड्डूच ठोकला होता. परंतु, आता अरविंद केजरीवाल यांचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला असून हेमंत सोरेन यांना जामीन देण्यात आला आहे.

त्यानंतर ईडीने आपला मोर्चा हेमंत सोरेन यांच्याकडे वळवला.

काय आहे प्रकरण?

प्रदीप बागची, विष्णू कुमार अग्रवाल, भानू प्रताप प्रसाद आणि इतरांविरुद्ध झारखंड पोलीस आणि पश्चिम बंगाल पोलिसांनी दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीनं मनी लॉन्ड्रिंग कायद्याच्या कलमांखाली गुन्हा नोंदवला. या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना ईडीनं आतापर्यंत १४ आरोपींना अटक केली आहे.

### अर्थसंकल्पात घोषणांचा पाऊस...

या निर्णयाचा लाभ राज्यातील 2 लाख 5 हजार मुलींना होणार असून 2024-25 पासून ही योजना सुरू होत आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची घोषणा केली. या योजनेतून पात्र कुटुंबाना वर्षाला 3 सिलेंडर मोफत देण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.शुभमंगल योजनेचा निधी वाढवला विवाहित मुलींसाठीच्या शुभमंगल योजनेच्या निधीत वाढ करण्यात आली आहे. या घोषणेंतर्गत आता 10 हजारांऐवजी 20 हजार रुपये निधी देण्यात येणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

राज्यातील महिलांसाठी 10 हजार पिंक रिक्षा देण्यात येतील, तसेच नवीन रुग्णवाहिका खरेदी केल्या जातील, अशी घोषणाही अजित पवारांनी केली.

यावर्षी 25 लाख महिलांना लखपती दिदी बनवण्याचा शासनाचा विचार आहे. तर, गाईच्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी प्रति लिटर 5 रुपयाचे अनुदान 1 जुलैपासून देण्यात येणार

नवी शासकीय महाविद्यालये स्थापन होणार

राज्यात सध्या 1 लाख लोकसंख्येमागे 84 डॉक्टर्स आहेत. 2035 पर्यंत 1 लाख लोकसंख्ये मागे 100 हून अधिक डॉक्टर्स करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयांची प्रवेश क्षमता वाढवणं आवश्यक आहे. त्यासाठी राज्यात 100 विद्यार्थी प्रवेश क्षमतेची नवी शासकीय महाविद्यालये आणि 430 खाटांची संलग्न रुग्णालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, जालना, हिंगोली, धाराशिव, परभणी, नाशिक,जळगाव, अमरावती, बुलढाणा, वाशिम, वर्धा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, अंबरनाथ येथे ही रुग्णालये उभारण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना जाहीर करण्यात आला आहे. या योजनेनंतर्गत दरवर्षी 10 लाख तरुण- तरुणींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच, दरवर्षी 10 हजार रुपयांचा स्टायफंड या तरुणांना मिळणार आहे.

### राज्याच्या अर्थव्यवस्थेत ७.६ टक्क्यांची वाढ...

या आर्थिक वर्षात राज्याच्या आर्थिक विकासात सेवा क्षेत्राचा सर्वात मोठा (६३.८ टक्के) वाटा असून त्याखालोखाल उद्योग (२५ टक्के) क्षेत्राचा नंबर लागतो. कृषी व संलग्न कार्यांममध्ये ११.२ टक्के वाढीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या दशकभराचा विचार करता राज्याच्या विकासात सेवा क्षेत्राचा सरासरी ५७.१ टक्के हिस्सा असून त्याखाली उद्योग (३०.९ टक्के) क्षेत्राचा नंबर लागतो. तर, कृषी आणि इतर संलग्न क्षेत्रांची १२ टक्के हिस्सेदारी आहे. २०२३-२४ चं राज्याचं उत्पन्न ४०.४४ लाख कोटी रुपये असून त्यामध्ये आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत १०.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. तर देशांतर्गत उत्पन्न २९३.९० लाख कोटी रुपये असून त्यात २०२२-२३ च्या तुलनेत ९.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. २०२३-२४ मध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न २,७७,६०३ रुपये इतकं अपेक्षित असून २०२२-२३ मध्ये ते २,५२,३८९ रुपये इतकं होतं. तसेच २०२३-२४ मध्ये देशाचं दरडोई उत्पन्न १,८३,२३६ रुपये असून गेल्या वर्षी ते १,६९,४९६ रुपये इतकं होतं. २०२२-२३ मध्ये दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत तेलंगणा राज्य देशात प्रथम क्रमांकावर असून त्याखालोखाल कर्नाटक, हरियाणा, तामिळनाडू, गुजरात ही राज्ये असून महाराष्ट्र याबाबतीत सहाव्या क्रमांकावर आहे.

### आणीबाणी हा देशाच्या इतिहासातील काळा...

१८ व्या लोकसभेतील मुर्मू यांच्या पहिल्या अभिभाषणामध्ये काँग्रेससह विरोधकांवर अनेक मुद्द्यांवर कठोर टीका करण्यात आली. विरोधक विकासाच्या आड येत असल्याचा गंभीर आरोही करण्यात आला. मात्र, राष्ट्रपतींनी 'आणीबाणी'चा मुद्दा उपस्थित करून 'एनडीए-३.०' सरकारचा 'इंडिया' आघाडीविरोधातील आक्रमक इरादा स्पष्ट केला. नवनियुक्त लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी बुधवारी या घटनात्मक पदावर निवड झाल्यानंतर पहिल्याच प्रस्तावात आणीबाणीचा निषेध करून काँग्रेसच्या संविधानाच्या मुद्द्याला जशास तसे प्रत्युत्तर दिले. राष्ट्रपतींनी अभिभाषणामध्ये त्याची री ओढलेली पाहायला मिळाली. 'येत्या काही महिन्यांत भारताच्या प्रजासत्ताकाला ७५ वर्षे पूर्ण होतील. भारतीय संविधानाने गेल्या काही दशकांमध्ये अनेक आव्हानांना तोंड दिले आहे. संविधान तयार होत असतानाही जगभरातील काही घटक भारताला अपयशी ठरवू पाहात होते. संविधान लागू झाल्यानंतरही अनेकवेळा संविधानावर हल्ले झाले. आणीबाणी हा संविधानावरील असाच एक हल्ला होता, असे मुर्मू म्हणाल्या. 'केंद्र सरकार भारतीय संविधानाला केवळ शासनाचे माध्यम मानत नाही, तर आपले संविधान सार्वजनिक जाणिवेचा भाग बनले पाहिजे यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारने २६ नोव्हेंबर हा संविधान दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली आहे, असे मुर्मू यांनी अभिभाषणात नमूद केले. जम्मू-काश्मीरमध्ये देखील देशाचे संविधान पूर्णपणे लागू झाले आहे. अनुच्छेद ३७० लागू होते तेव्हा परिस्थिती अत्यंत वेगळी होती, असा उल्लेख करत मुर्मूंनी केंद्र सरकार संविधानातील मूल्यांनाच प्राधान्य देत असल्याचा अप्रत्यक्ष दावा केला. ऑगस्ट २०१९ मध्ये मोदी सरकारने जम्मू-काश्मीरचा विशेषाधिकार काढून घेतला होता. यंदा लोकसभा निवडणुकीत जम्मू-काश्मीरमध्ये विक्रमी मतदान झाल्याचा उल्लेखही मुर्मूंनी आवर्जून केला. पेपरफुटीविरोधात कठोर कारवाई देशभर गाजत असलेल्या व केंद्र सरकारला अडचणीत आणणाऱ्या पेपरफुटीच्या प्रकरणाचाही राष्ट्रपती मुर्मू यांनी अभिभाषणामध्ये उल्लेख करून केंद्र सरकारकडून केल्या जात असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. 'नीट' व 'नेट' परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याने लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून देशभर विविध ठिकाणी विद्यार्थी आंदोलन करत आहेत. त्यासंदर्भात, 'सरकारी नोकरभरती असो की परीक्षा, कोणत्याही कारणाने त्यात व्यत्यय येत असेल तर ते योग्य नाही. परीक्षा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची आहे. काही परीक्षांमधील पेपरफुटीच्या अलीकडील घटनांची नि:पक्षपातीपणे चौकशी करून दोषींना कठोरात कठोर शिक्षा देण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे', अशी ग्वाही राष्ट्रपती मुर्मू यांनी दिली. केंद्र सरकारची तरफदारी करताना मुर्मू यांनी पूर्वीही पेपरफुटीच्या घटना घडल्याचे सांगत अप्रत्यक्षपणे विरोधकांवर अप्रत्यक्ष टीका केली. 'यापूर्वीही अनेक राज्यांमध्ये पेपरफुटीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन पेपरफुटीच्या घटना रोखण्यासाठी देशव्यापी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. संसदेनेही परीक्षेतील अनियमिततेविरोधात कडक कायदा केला आहे. केंद्र सरकार परीक्षांशी संबंधित संस्था, त्यांची कार्यपद्धती, परीक्षाप्रक्रिया आदींमध्ये सुधारणा करण्याच्या दिशेने काम करत आहे, असे मुर्मू म्हणाल्या. संसदेच्या कामकाजातील अडथळ्यांवर आक्षेप संसदेमध्ये विरोधकांकडून घेतले जाणारे आक्षेप व त्यामुळे संसदेच्या कामकाजामध्ये येणाऱ्या अडथळ्यांवर राष्ट्रपती मुर्मू यांनी नाराजी व्यक्त केली. 'केंद्र सरकारच्या धोरणांना विरोध आणि संसदीय कामकाजाला विरोध या दोन भिन्न गोष्टी आहेत. संसद सुरळीत चालते तेव्हाच विविधांगी चर्चा होते, दूरगामी निर्णय घेतले जातात व लोकांचा विश्वास केवळ सरकारवरच नव्हे तर, संपूर्ण व्यवस्थेवर निर्माण होतो. त्यामुळे संसदेतील अधिवेशनाच्या प्रत्येक क्षणाचा योग्य उपयोग करून जनहिताला प्राधान्य पाहिजे', असे मत मुर्मू यांनी व्यक्त केले. विकसित भारताच्या दिशेने... केंद्र सरकारने गेल्या १० वर्षांत विविध क्षेत्रांमध्ये सुधारणा घडवून आणल्या आहेत. त्यामुळे विकासाला गती मिळाली असून येत्या काळात सरकार व संसदेने घेतल्या जाणाऱ्या निर्णयाकडे जग आतुरतेने पाहात आहे. या सुधारणांमुळे देशामध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. भारत विकसित देश होण्यासाठी नवी गती मिळाली आहे, असे सांगत मुर्मू यांनी दहा वर्षांतील 'एनडीए' सरकारच्या विविध धोरणांचा, योजनांचा व त्यांच्या यशांची माहिती दिली.

### दिव्यातील फुटपाथ फेरीवाल्यांनी व्यापले,ठाणे महापालिकेच...

मुंब्रादेवी कॉलनीतील रत्याच्या फुटपाथवर अनधिकृत फेरीवाले बसलेले आहे इतकंच काय काहींनी तर रस्ता देखील सोडलेला नाही. या पादचारी आणि फेरीवाल्यांध्ये सतत वाद होत असल्याने मोठे दुकानदार व महिला ही त्रासुन गेले आहेत. शिवाय फेरीवल्यांची दुकाने रस्त्यापर्यंत पोहचल्याने पादचाऱ्यांसह या मार्गावर वाहन चालकांना देखील मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. या वाढत्या गर्दीमुळे या परिसरात महिलांचे मंगळसुत्र चोरणे, पाकिट मारणे आणि मारामारी अशा घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. याबाबत पालिका आणि पोलिसांना नागरिकांकडून मोठ्या तक्रारी येत होत्या. त्यानुसार पालिकेने रस्त्यावर स्टॉल लावणाऱ्यांवर अनेकदा कारवाया करतात मात्र काही क्षणातच पुन्हा हे फेरीवाले बसताना रस्त्यावर पहायला मिळत आहेत.

### तुतारी, टाळ मृदंगाचा निनाद अन् विण्याचा झंकार; लाखो...

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे लाखो भाविकांच्या साक्षीने शुक्रवारी दुपारी २.२५ वाजता खासदार श्रीरंग बारणे, सुनेत्रा पवार, आमदार सुनील शेळके, महेश लांडगे, अश्विनी जगताप, उमा खापरे, आमदार शेळके यांच्या पत्नी व जेष्ठ वारकरी व पंढरीनाथ महाराज तावरे यांच्या हस्ते झाली. आषाढी वारीत सहभागी झालेले वारकरी खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका आणि महिला वारकऱ्यांनी डोक्यावर तुळशीवृंद घेऊन मुखी हरिनामासह ''ज्ञानोबा- तुकाराम'' हा जयघोष करीत हा पालखी सोहळा लाखो भाविकांचा भक्तीचा महासागर पंढरीच्या वाटेला लागला. चोपदाराचा दंड आणि शिंगाड्याच्या आवाज होताच साऱ्या आसमंतांत मृदंग, टाळ,विणा यांच्या निनाद गुजला आणि सार देऊळवाडा परिसर दमाणून गेला होता. या वातावरणात पालखी पहिल्या मुक्कामासाठी इनामदार वाड्याकडे रवाना झाली. श्री क्षेत्र देहूगाव मध्ये पालखीचे प्रस्थान असल्याने मुख्य मंदिर, वैंकुठगमण मंदिर परिसरातील इंद्रायणी नदी काठ पहाटे पासूनच फुललेला होता. पहाटे पासून इंद्रायणी नदी काठी आंघोळ करून भाविक दर्शनासाठी जात होते. प्रथेनुसार प्रस्थान सोहळयाच्या निमित्ताने पहाटे पाच वाजता विठ्ठल रुक्मीनी मंदिरात व शीळा मंदिरात संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, पालखी सोहळा प्रमुख माणिक महाराज मोरे, संतोष महाराज मोरे, यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. त्यानंतर पालखी इनामदार वाड्यात आणण्यात आली. दिलीप महाराज मोरे गोसावी यांच्या हस्ते पादुकांची विधीवत पूजा करण्यात आली. ही पूजा उरकल्यानंतर पादुका काल्याचे किर्तन झाल्यानंतर आणि इनामदार वाड्यातून पादुका मानकरी गंगा म्हसलेकर मंडळींच्या ताब्यात देण्यात आल्या. म्हतारबा दिंडीसह ह्या पादुका डोक्यावर घेऊन टाळ मृदंगाच्या तालवर भक्तीमय वातावरणात वाजत गाजत मुख्यमंदिरात आणण्यात आल्या. येथे मंदिराला प्रदक्षिणा घालुन भजनी मंडपात आणल्या. याच वेळी प्रस्थान सोहळयासाठी उपस्थित रहण्यासाठी आलेल्या दिंड्या आपआपल्या क्रमाने मुख्यमंदिरात प्रवेश करीत होत्या. या सोहळयासाठी मानाच्या दिंड्या, फडकरी व विणेकरी यांनी महाद्वारातून मंदिराच्या आवारात येऊन भजन म्हणत आपला शीनभाग घालवत, पावले खेळत मंदिराला प्रदक्षिणा घालत होते.

# मुंबई महानगरपालिकेतर्फे जलबोगद्यांचा विक्रम... न्यूयॉर्कपाठोपाठ सर्वांत मोठे जाळे... पण यातून पाणी प्रश्न सुटणार का?

शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था जुनी व जीर्ण झाली असल्यामुळे वारंवार जलवाहिन्या फुटणे, गळती यांसारख्या घटना घडतात. त्यामुळे मुंबई महानगरपालिकच्या पाणी पुरवठा प्रकल्प विभागाने गेल्या काही वर्षांपासून बोगदे बांधण्याचे काम हाती घेतले आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरानंतर १०० किलोमीटर जलबोगदे असणारे मुंबई महानगर जगातील दुसरे शहर ठरले आहे, असा दावा पालिका प्रशासनाने केला आहे. पालिकेने नुकतेच वडाळा ते परळ दरम्यानच्या ५.२५ किमी लांबीच्या दुसऱ्या टप्प्याच्या जलबोगद्याचे खणनही पूर्ण केले आहे. त्या निमित्ताने जलबोगद्यांच्या उपयुक्ततेविषयी....



मुंबईतील पाणीपुरवठ्याची यंत्रणा कशी आहे?

मुंबई शहराला तानसा, मोडकसागर, मध्य वैतरणा, उर्ध्व वैतरणा, भातसा या मुख्य धरणातून पाणी पुरवठा करण्यात येतो. हे जलस्रोत मुंबईपासून १०० किमी किंवा त्यापेक्षा जास्त अंतरावर असतात. या सर्व जलस्रोतांमधून पाणी भूमिगत जलबोगद्यांद्वारे किंवा जलवाहिन्यांद्वारे जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत आणले जाते. जलशुद्धीकरण केंद्रापासून पाणी शहराच्या विविध भागांत जलवाहिन्यांद्वारे पोहोचवले जाते. धरणातील पाणी जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहोचवणारी व्यवस्था ही प्राथमिक स्तर व्यवस्था म्हणून ओळखली जाते. तर जलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रिया केलेले शुद्ध पाणी महासंतुलन जलाशयात साठवून पुढील वितरणासाठी शहरात ठिकठिकाणी असलेल्या २७ सेवा जलाशयापर्यंत पोहोचवले जाते. या जलवितरण जाळ्यास द्वितीय स्तर वहन व्यवस्था म्हणतात. तर सेवा जलाशयातील पाणी जलवाहिन्यांद्वारे सुमारे साडेतीन लाख जलजोडण्यांद्वारे घरोघरी पोहोचवले जाते. या प्रणालीला तृतीय स्तर प्रणाली म्हणतात.

जलबोगद्यांची गरज काय?

मुंबईसारख्या अवाढव्य शहरात पाणी पुरवठ्याची यंत्रणा अनेक वर्षे जुनी आणि गुंतागुंतीची आहे. पालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रापासून शहरात पाणी पुरवठ्यासाठी सध्या भल्यामोठ्या जलवाहिन्या आहेत. या जलवाहिन्या काही ठिकाणी जमिनीवर आहेत. तर काही जलवाहिन्या जमिनीखाली पण जमिनीलगत आहेत. त्यामुळे त्या सुरक्षित नाहीत. अनेक ठिकाणी जलवाहिन्या फुटण्याच्या घटना घडतात. कधी जलवाहिनी फुटल्याचे लक्षात येते तर अनेकदा जलवाहिनीची गळती कळतही नाही. काही ठिकाणी जलवाहिन्या फोडून त्यातून पाणीचोरीच्या घटनाही घडतात. त्यामुळे एकूण पाणी पुरवठ्यापैकी तब्बल २७ टक्के पाणी वाया जाते. त्याचबरोबर पाणी गळती सुरू झाली की दूषित पाण्याचीही समस्या वाढते. त्यामुळे साथीचे आजार होण्याची शक्यता बळावते. पाणी पुरवठ्याची ही यंत्रणा अधिक सुरक्षित व सक्षम करण्यासाठी जलबोगदे तयार करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने काही वर्षांपूर्वी घेतला. टप्प्याटप्प्याने हे जलबोगदे बांधले जात असून आतापर्यंत १०० किमीचे जलबोगदे तयार करण्यात आले आहेत .

जलबोगदे बांधताना आव्हाने कोणती?

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात जमिनीखालीदेखील जागा शिल्लक नाही. असे असतानाही शंभर मीटर खोलीवर हे बोगदे तयार करण्यात आले आहेत. मात्र या जलबोगद्यांसाठी खणन करताना अनेक अडचणींचा सामना यंत्रणेला करावा लागतो. भूगर्भात प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळ्या प्रकारचे अडथळे येतात. काही ठिकाणी माती भुसभुशीत असते तर काही ठिकाणी खडक असतात. कधी अचानक जमिनीखालील झरे आड येतात. वारंवार बदलणारे भूगर्भीय स्तर तसेच बोगद्यात खडक ढासळणे अशा प्रकारच्या अनेक आव्हानांना बोगद्याचे खणन करताना तोंड द्यावे लागते. पवई ते घाटकोपर दरम्यान जलबोगदा खणण्याचे काम अशाच आव्हानांमुळे सुमारे दहा वर्षे रखडले होते. त्या दरम्यान जमीन खचून खड्डा तयार झाला होता. त्यामुळे बोगदा खणणारे यंत्र बंद पडले होते. हे यंत्र बाहेर काढणेही कठीण झाले होते. त्यामुळे हे काम बंद करून नव्याने कंत्राटदार नेमावा लागला. तसेच आधीच्या कंत्राटदाराला नुकसान भरपाईही द्यावी लागली होती.

आतापर्यंत कोणकोणते बोगदे तयार केले?

पालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्प विभागाने मरोशी – माटुंगा बोगद्याचे काम २०१५ मध्ये पूर्ण केले. मरोशीपासून रुपारेल महाविद्यालयापर्यंत वाकोला आणि माहीममार्गे पूर्ण झालेल्या १२.२५ किमी लांबीच्या बोगद्याचे काम पूर्ण होऊन कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यामुळे वरळी, प्रभादेवी, दादर, शिवाजी पार्कपासून थेट बांद्रा पाली हीलपर्यंतच्या जुन्या इमारतींच्या पाणी पुरवठ्यात सुधारणा झाली आहे. गुंदवली-कापूरबावडी आणि कापूरबावडी ते भांडूप संकुल हे १५.१ किमी लांबीचे बोगदे पूर्ण करण्यात आले. भविष्यात गारगाई पिंजाळ प्रकल्पातून मिळणारे पाणी वाहून नेण्याची क्षमता या बोगद्यांमध्ये आहे.पवई ते वेरावली आणि पवई ते घाटकोपर या ६.६ किमी. लांबीच्या बोगद्यांची कामे प्रगतिपथावर आहेत. चेंबूर ते परळ या ९.७ किमी लांबीच्या जलबोगद्याचे कामही नुकतेच पूर्ण झाले आहे.

पाणी पुरवठ्यात सुधारणा होणार का?

पाणी पुरवठ्याची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्यावतीने मुंबई अनेक ठिकाणी जलबोगदे तयार केले जात आहेत. पाणी चोरी आणि पाणी गळती थांबल्यामुळे पाण्याचा दाब वाढून पाणी पुरवठ्यात सुधारणा होईल, असा विश्वास पालिकेच्या यंत्रणेला आहे. पालिकेच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय प्रणालीमध्ये जलवाहिन्या आणि जलबोगदे यांचा समावेश आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# राष्ट्रीय महापुरुषांच्या फोटो विना राज्यात कोणताच कार्यक्रम होऊ शकत नाही - अँड. वैशाली डोळस



● कल्याण : राष्ट्रीय महापुरुषांच्या फोटो विना राज्यात कोणताच कार्यक्रम होऊ शकत नाही असे मत अँड. वैशाली डोळस यांनी व्यक्त केले. कल्याण डोंबिवली महापालिका बहुजन कर्मचारी परिवर्तन संस्था कल्याण यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहु महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर या राष्ट्रीय महापुरुषांची संयुक्त जयंती महोत्सव कार्यक्रमाचे बुधवारी आयोजन करण्यात आले होते यावेळी त्या बोलत होत्या. या संयुक्त जयंती महोत्सवाचे महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रल्हाद रोडे, उप आयुक्त अवधूत तावडे आणि उप आयुक्त प्रसाद बोरकर, डॉ. दिपा शुक्ला, माजी महापौर रमेश जाधव यांच्या हस्ते सकाळी उद्घाटन झाले. सकाळच्या सत्रामध्ये आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, मोफत नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप, कॅल्शियम तपासणी, मधुमेह तपासणी आणि जनरल तपासणी त्याच बरोबर मोफत औषध वाटप रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी संस्थेच्या वतीने ग्रुप इन्शुरन्स द्वारे महापालिका कर्मचारी यांचे कुटुंबीय मंजुळा कामडी आणि सोनी आठवाल यांना दोन लाखाचा चेक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

■ दुसऱ्या सत्रात आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण पश्चिम या ठिकाणी देशभक्ती पर व महापुरुषांच्या जीवन कार्यावर समुह नृत्य स्पर्धा घेण्यात आली असून त्याचे उदघाटन अभिनेत्री सविता हांडे यांच्या हस्ते झाले. तसेच महापुरुषांच्या जीवन कार्यावर प्रमुख व्याख्यात्या वैशाली डोळस यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विचार मंचावर उपस्थित अतिरिक्त आयुक्त धैर्यशील जाधव, उपायुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त निलम कदम, तसेच संस्थाध्यक्ष चंद्रकांत पोळ, जयंती समिती अध्यक्ष कल्पना खरात उपस्थित होत्या.

■ यावेळी मान्यवरांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज दत्तक योजना अंतर्गत १५ गरीब व गरजू मुलांची वार्षिक जबाबदारी संस्थेने घेतली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्था अध्यक्ष चंद्रकांत पोळ, सरचिटणीस विजय सरकटे, जयंती समिती अध्यक्ष कल्पना खरात, सचिव सुवर्णा गायकवाड, कोषाध्यक्ष संजीवनी पाटकर, पौर्णिमा कांबळे, युगा नलावडे, अनघा पवार, सीमा आठवले, संजय ओंकारेश्वर, प्रवीण कांबळे, अनिता शिंदे, राहुल पवार, समाधान मोरे, भूषण कोकणे, श्रीकांत वाघमारे, नागेश टोळ, संतोष हेरोडे, नवनीत गायकवाड, सुनील अंबाडे, भाऊराव पंडित, सुनील चाटे, संदीप गिरी, युवराज गाडे, उत्तम साबळे, रमेश चौरे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाधान मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष हेरोडे यांनी केले.

## कर्जत पोलिस ठाण्याच्या वतीने कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न




● कर्जत : जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या अनुषंगाने कर्जत पोलीस ठाणे हद्दितील कोकण ज्ञानपीठ फार्मसी कॉलेज कर्जत येथे अंमली पदार्थ विरोधी दिनांबाबत कार्यशाळेचे आयोजन करुन कॉलेज मधील विद्यार्थी यांना अंमली पदार्थाच्या व्यसनापासुन कसे दुर रहावे याबाबत पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी मार्गदर्शन केले.

सदर शिबीरामध्ये कोकण ज्ञानपीठ कॉलेज मधील शिक्षकांसह १२५ ते १५० विद्यार्थी उपस्थित होते.जागतीक अंमली पदार्थ विरोधी सप्ताहचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी कर्जत पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार यांना अंमली पदार्थाचे सेवनाचे दुष्परिणामाबाबत माहीती देवुन मार्गदर्शन केले तसेच सदर वेळी जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या अनुषंगाने अंमली पदार्थ सेवन करणार नाही याबाबत सर्वांनी शपथ घेतली .

## रहिवासी पार्किंग सर्वेक्षणाच्या लिंकवर 28 जून रोजी रात्री 12 वाजेपर्यंत माहिती भरुन सहभागी होण्याचे आवाहन



● नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास वापराच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.123/2016 दाखल केलेली होती. मा.उच्च न्यायालयाने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये आवश्यक असलेल्या पार्किंगच्या आवश्यकतेबाबत सर्वेक्षण तसेच अभ्यास करुन त्याबाबत शासनास योग्य त्या शिफारशी करण्याबाबत आदेशित केलेले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीने नवी मुंबई शहरातील नागरिकांचे मत जाणून घेणेबाबत एकमताने मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर ऑनलाईन लिंक तयार करण्यात आलेली असून त्यामध्ये नमूद केलेल्या प्रश्नावलीनुसार नागरिकांकडून पार्किंगच्या अनुषंगाने माहिती प्राप्त होणे अपेक्षित आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यास गठीत समितीस माफक व पुरेशा पार्किंगबाबत स्थापित करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीस सर्वंकष विचार करता येईल. या ऑनलाईन लिंकवर आत्तापर्यंत 13820 नागरिकांनी आपला अभिप्राय नोंदविलेला असून अभिप्राय नोंदविलेल्या नागरिकांमुळे शहराच्या पार्किंग नियोजनात उपयोग होणार आहे. यामध्ये बेलापूर-1503, नेरुळ-2754, वाशी-1963, तुर्भे-957, घणसोली-1247, कोपरखैरणे -3831, ऐरोली-1280, दिघा- 285 अशाप्रकारे 13820 नागरिकांचा प्रतिसाद प्राप्त झालेला आहे. सदर लिंकवर नागरिक 28 जून रोजी रात्री 12.00 वा. पर्यंत आपली माहिती भरू शकतील तरी नवी मुंबईकर नागरिकांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आवाहन करण्यात येते की https://forms.gle/vrTFN3kbfFdiLS7M9 या पार्किंग सर्वेक्षणाबाबतच्या लिंकवर त्वरित माहिती भरून सहभाग घ्यावा.

## सुब्रतो मुखर्जी कप जिल्हास्तर शालेय फुटबॉल स्पर्धेचा उत्साहात प्रारंभ



● नवी मुंबई - विविध खेळांच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध् करुन देण्यासाठी नवी मुंबई महापालिका कटिबध्द असून महापालिका क्षेत्रातून गुणवंत खेळाडू घडावेत हा उद्देश आहे. या सर्व स्पर्धांतून आपली गुणवत्ता सिध्द करणारे खेळाडू घडतील व राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कर्तृत्व गाजवतील असा विश्वास नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त् केला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद ठाणे आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त् विदयमाने आयोजित जिल्हा स्तरीय सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा 2024-25 शुभारंभ प्रसंगी आयुक्तांनी उपस्थित विदयार्थ्यांशी संवाद साधला.

नवी मुंबई महानगरपालिका खेळाला प्राधान्य देत असून त्याचाच एक भाग म्हणून या फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगत या स्पर्धेमध्ये 94 संघ व 1500 हून अधिक खेळाडू सहभागी होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. शालेय जीवनात अभ्यासाप्रमाणेच अंगभूत कौशल्य विकसीत होतात व पुढील जीवनावर त्याचा सकारात्मक परिणाम होत असतो हे लक्षात घेत प्रत्येक विदयार्थ्याने आपल्या आवडीचा खेळ पूर्ण क्षमतेने खेळला पाहिजे असेही आयुक्त् म्हणाले. याप्रसंगी अतिरिक्त् आयुक्त् तथा शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपआयुक्त् श्रीम. अभिलाषा म्हात्रे, क्रीडा अधिकारी श्री. रेवप्पा गुरव, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा नमुंमपा क्रीडा नियोजन समिती सदस्य श्री. धनंजय वनमाळी आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपआयुक्त् श्रीम. अभिलाषा म्हात्रे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेला शालेय क्रीडा आयोजनासाठी जिल्हयाचा दर्जा लाभलेला असून महानगरपालिका आयोजित करीत असलेल्या शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये तीस हजाराहून अधिक विदयार्थी सहभागी होतात असे सांगितले. सुब्रतो मुखर्जी कप या फुटबॉल स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे या स्पर्धेत विविध स्तरांवर जिंकत जाणारा शाळेचा फुटबॉल संघ थेट राष्ट्रीय स्तरावरही खेळू शकतो अशीही माहिती त्यांनी दिली.

## केडीएमटीच्या ई बसेस साठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आंदोलन

### पंचवीस रूपये किलोच्या दराने बस खरेदी करण्याची दर्शवली तयारी



● कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या परिवहन सेवेत ई बसेस दाखल होऊन बरेच महीने झालेत, पण एक ही बस सेवेत रूजू झाली नाही. सर्व ई बसेस आगारात उभ्या असून भंगार होत आहेत. त्या साठी गुरूवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा सह संघटक रूपेश भोईर यांच्यातर्फे आंदोलन करण्यात आले.

यावेळी रूपेश भोईर यांनी महापालिकेच्या परिवहन सेवेवर आरोप केले की, जाणूनबूजून परिवहनचे अधिकारी ई बसेसना भंगार करीत आहेत. जेणेकरुन नंतर बसेसना भंगारात विकून आर्थिक मलीदा खाता येईल. रूपेश भोईर यांनी बसेसना भंगारात विकून घेण्यासाठी पंचवीस रूपये प्रति किलोचा भाव देण्याची तयारी दर्शवली. या आन्दोलना वेळी शिवसेनेचे विधानसभा संघटक रविंद्र कपोते, अवजड वाहतुक सेनेचे निलेश भोर, राष्ट्रवादीचे दिनेश परदेशी यांच्या समवेत शिवसेनिक उपस्थित होते.

यावेळी परिवहन सेवेचे व्यवस्थापक सावंत यांना ई बस लवकरात लवकर सुरू करण्यासाठी निवेदन दिले. सावंत यांनी एका आठवड्यात ई बस सेवा सुरू करण्याची हमी दिली. याप्रसंगी शिवसैनिकांच्या लक्षात आले की परिवहन सेवेच्या आगाराचे उदघाटन शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांच्याहस्ते करण्यात आले होते. पण आता परिवहन सेवेच्या आगारात आदित्य ठाकरे यांच्या नावाची पाटी गायब झालेली आहे. रूपेश भोईर यांनी परिवहन व्यवस्थापकांना इशारा दिली की, आजच्या आज जर पाटी दर्शनी ठिकाणी नाही लावली तर उद्या महापालिका मुख्यालयात एक ही पाटी दिसणार नाही.

## घोडबंदरच्या भरवस्तीतील आरएमसी प्रकल्प सुरूच

### आरोग्य समस्या उद्भवण्याच्या भीतीने नागरिक चिंताग्रस्त



● ठाणे : ठाणे ते बोरिवली या भुयारी मार्गाच्या कामासाठी घोडबंदर येथील हावरे सिटी गृहसंकुलाजवळील परिसरात उभारण्यात आलेला सिमेंट काँक्रीट तयार करण्याचा (आरएमसी) प्रकल्प नागरिकांच्या विरोधानंतरही सुरूच असल्याचे चित्र आहे. स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांच्या सुचनेनंतर बंद करण्यात आलेला हा प्रकल्प संबंधित ठेकेदाराने पुन्हा सुरू केला असून या प्रकल्पामुळे आरोग्य समस्या उद्भवण्याच्या भितीने नागरिक चिंताग्रस्त झाले आहेत. दरम्यान, येत्या रविवारी हावरे सिटी गृहसंकुलातील नागरिक एकत्रित येऊन विविध उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृतीबरोबरच प्रकल्पाचा विरोध करणार आहेत.

ठाणे आणि मुंबईकरांच्या प्रवासाचा खर्च आणि वेळेची बचत व्हावी यासाठी ठाणे ते बोरिवली असा भुयारी मार्ग उभारण्यात येत आहे. या कामाकरिता घोडबंदर येथील कासारवडवली भागातील हावरे सिटी गृहसंकुलाजवळील परिसरात आरएमसी प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. या प्रकल्पाच्या कामादरम्यान होणाऱ्या आवाजामुळे नागरिक त्रस्त आहेत. विशेष म्हणजेच, या प्रकल्पापासून काही अंतरावर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान असून प्रकल्पाच्या आवाजाचा त्रास वन्यजीवांवर होत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले. त्याचबरोबर सिमेंटची पावडरच्या धुलीकणांमुळे लहान मुले, तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांना कर्करोग, दमा, श्वासोच्छवासाच्या समस्यासह इतर आजारांचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक रहिवाशांमधून संताप व्यक्त होत आहे. नागरिकांनी भरवस्तीतून हा प्रकल्प हटविण्याबाबत विविध विभागांकडे तक्रारी करण्याबरोबरच निषेध व्यक्त केला होता. तसेच या प्रकल्पाबाबत नागरिकांकडून स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांना प्राप्त झाल्या होत्या. त्याची दखल घेऊन त्यांनी घटनास्थळी जाऊन प्रकल्पाची पाहाणी केली होती.

## पनवेलमध्ये १ मेट्रीक टन प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त



● पनवेल: पनवेल महापालिका मधील पनवेल, कामोठे, कळंबोली व खारघर या परिसरातून १ मेट्रीक टन वजनाच्या प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त केला असून ५५ हजार रुपयांचा दंड व्यापा-यांकडून वसूल केला आहे. मागील अनेक वर्षात एक मेट्रीक टन प्लास्टिक पिशव्या जप्त करण्याची पनवेल महापालिकेची ही पहिलीच वेळ आहे.

शासनाच्या निर्देशानंतर पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी प्लास्टिक पिशव्यांविरोधात कारवाई करण्याचे आदेश तीन दिवसांपूर्वी पालिका प्रशासनाला दिले. पालिका उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी पालिका क्षेत्रात सिंगल वापर करणा-या प्लास्टिकचा साठा करणा-या व्यापा-यांवर लक्ष केंद्रीत करण्याच्या सूचना आरोग्य निरिक्षकांना दिल्या. यानूसार खारघर प्रभाग समिती ‘अ ‘ मध्ये ६४० किलो प्लास्टिक पिशव्यांचा वापर करताना आढळले. या प्लास्टिक पिशवी जप्त करुन त्यांच्याकडून आरोग्य निरीक्षक जितेंद्र मढवी, स्वच्छता निरीक्षक अतुल मोहोकर, संदीप भोईर, अजय ठाकुर, अतिक्रमण विभाग व स्वच्छता दूत यांनी १० हजार रुपये दंड वसूल केला. तसेच प्रभाग समिती ‘ब’ मध्ये आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक अमोल कांबळे, हरेश कांबळे, अमित जाधव, दिग्नेश भोईर यांनी ९५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. या व्यापा-यांकडून १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. प्रभाग समिती ‘क’ कामोठे व ‘ड’ पनवेल शहरामध्ये पालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, स्वच्छता निरीक्षक योगेश कस्तुरे, ऋषिकेश गायकवाड, अतुल वास्कर, महेंद्र भोईर, धनश्री पीवाल आणि कर्मचा-यांनी २६५ किलो प्लास्टिक जप्त करुन व्यापा-यांकडून 30 हजार रुपये दंड वसूल केला.

## केडीएमसीच्या वतीने १०वी, १२वी च्या विद्यार्थ्यांना करियर मार्गदर्शन

### करीअर मार्गदर्शन प्रशिक्षणाचा आयुष्यातील चांगले निर्णय घेण्यास उपयोग होईल - महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़





● कल्याण : आर्ट ऑफ लिव्हींग संस्थेच्या प्रशिक्षकांनी दिलेल्या प्रशिक्षणाचा आयुष्यातील चांगले निर्णय घेण्यास उपयोग होईल, असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी केले. कल्याण डोंबिवली महानगरपालिका व आर्ट ऑफ लिव्हींग या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने १०वी व १२वी च्या विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजिलेल्या "करिअर मार्गदर्शन" या कार्यक्रमात बोलताना महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे प्रतिपादन केले.

शाळेत मुले शिकतात व महाविद्यालय विद्यार्थ्यांना घडविते त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणानंतर पुढील प्रोफेशन निवडताना काळजीपूर्वक निवडावे अशाही सूचना त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिल्या. आपले कौशल्य व ज्ञान अद्यावत केले तर यशप्राप्ती फार दूर नाही. यशस्वी करिअरसाठी प्रथम स्वप्न बघायला शिकावे, सवयी चांगल्या असतील तर यश लवकर मिळेल, आपले पॅशन ओळखायला शिका आणि योग्य करिअर निवडा, करिअरसाठी विचारपूर्वक आखणी करुन आपले उद्दीष्ट्ये निश्चित करा, असे आपल्या ओघवत्या भाषा शैलीत विविध उदाहरणांच्या आणि सादरीकरणांच्या माध्यमातून सांगत आर्ट ऑफ लिव्हींग या संस्थेचे प्रशिक्षक नील पांडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले.

“ आर्ट ऑफ लिव्हींगच्या प्रशिक्षक कृतीका यांनी देखील उद्बोदक गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त धैर्यशील जाधव यांनी केले. या कार्यक्रमास १०वी व १२वी च्या विद्यार्थी वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाची सांगता महापालिकेच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी घेतलेल्या ऊँकार, भस्रिका प्राणायाम आणि ध्यानाने करण्यात आली. शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी सर्वांचे आभार मानले.

# फायनल आणि राखीव दिवशीही पावसाचं सावट; सामना रद्द झाल्यास कोणाला मिळणार जेतेपदाचा करंडक?






दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानला आणि भारताने इंग्लंडला पराभूल करुन टी-२० विश्वचषक २०२४ च्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यामुळे आता भारत आणि दक्षिण आफ्रिका संघात अंतिम सामना खेळला जाणार आहे. हा सामना २९ जून रोजी केन्सिंग्टन ओव्हल, ब्रिजटाऊन, बार्बाडोस येथे होणार आहे. भारत-इंग्लंड उपांत्य फेरीच्या सामन्याप्रमाणेच अंतिम सामन्यावरही पावसाचे सावट आहे. मात्र, एक चांगली गोष्ट म्हणजे विजेतपदाच्या सामन्यासाठी राखीव दिवस ठेवण्यात आला आहे, पण राखीव दिवशी पण पावसामुळे व्यत्यय आणला तर तर काय होणार? विजेता कोण ठरणार, भारत की दक्षिण आफ्रिका? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे जाणून घेऊया.

भारत आणि दक्षिण आफ्रिका या संघांनी या स्पर्धेत आतापर्यंत एकही सामना गमावलेला नाही. भारताने आतापर्यंत खेळलेले सर्व ७ सामने जिंकले आहेत. भारताचा एक सामना पावसामुळे रद्द झाला होता. त्याच वेळी दक्षिण आफ्रिकेने खेळलेले सर्व ८ सामने जिंकले. अशा स्थितीत भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील ट्रॉफीची लढत रोमांचक होण्याची शक्यता आहे. प्रथमच दक्षिण आफ्रिकेचा संघ कोणत्याही विश्वचषकाच्या अंतिम फेरीत भारतासमोर दिसणार आहे.

बार्बाडोसमधील हवामान अहवाल काय आहे?

टाईम्स ऑफ इंडियामध्ये प्रकाशित झालेल्या Accuweather च्या अहवालानुसार, शनिवारी (२९ जून) ढगाळ वातावरण असेल. एवढेच नाही तर वारा वाहणार असून तो दमट असणार आहे. पाऊस आणि वादळाचीही शक्यता आहे. दिवसाच्या सुरुवातीला ९९% ढग आहे आणि वादळाची ४७% शक्यता आहे. स्थानिक वेळेनुसार सकाळी १० वाजता सामना सुरू होईल. त्याच वेळी, भारतात हा सामना रात्री ८ वाजल्यापासून पाहता येईल.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम सामन्यासाठी आयसीसीने ३० जून हा राखीव दिवस म्हणून ठेवला आहे. सर्वप्रथम २९ जून रोजी होणारा सामना आयोजित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. जर हा सामना २९ तारखेला पडू शकला नाही, तर तो राखीव दिवशी खेळला जाईल. राखीव दिवशी, सामना २९ जून रोजी जिथे थांबला होता तिथून पुढे सुरू होईल.

# Kalki 2898 AD ची जबरदस्त ओपनिंग!

## प्रभासच्या सिनेमाने मोडले त्याचेच रेकॉर्ड्स, पहिल्या दिवशी कमावले तब्बल...




यंदाचा बहुप्रतिक्षित व बिग बजेट चित्रपट 'कल्की 2898 एडी' गुरुवारी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. प्रभास, अमिताभ बच्चन, दीपिका पादुकोण, दुल्कर सलमान, कमल हासन अशी तगडी स्टारकास्ट असलेल्या या सिनेमाबद्दल प्रेक्षक खूप उत्सुक होते. चित्रपटाला पहिल्याच दिवशी दमदार प्रतिसाद मिळाला आहे.

नाग अश्विन दिग्दर्शित 'कल्की 2898 एडी' हा सायन्स फिक्शन चित्रपट गुरुवारी (२७ जून रोजी) थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाची क्रेझ एवढी होती की पहिल्या दिवसासाठी जबरदस्त आगाऊ बुकिंग झाली. थिएटरमध्ये रिलीज झाल्यानंतर 'कल्की 2898 एडी'ने बॉक्स ऑफिसवर बंपर ओपनिंग केली आहे. या चित्रपटाने पहिल्या दिवशी किती कलेक्शन केलं, ते जाणून घेऊया.

'कल्की 2898 एडी' हा २०२४ चा बहुप्रतिक्षित चित्रपट होता आणि चाहते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. अखेर हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि याला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. 'कल्की 2898 एडी' ने रिलीजच्या पहिल्याच दिवशी इतिहास रचला आहे आणि या चित्रपटाने ओपनिंगच्या दिवशीच अनेक मोठ्या चित्रपटांना मागे टाकलं आहे. आता चित्रपटाच्या पहिल्या दिवसाच्या कमाईचे प्रारंभिक आकडे आले आहेत.

'सॅकनिल्क' च्या सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्टनुसार, 'कल्की 2898 एडी' ने रिलीजच्या पहिल्या दिवशी ९५ कोटी रुपयांची जबरदस्त ओपनिंग केली आहे. यापैकी तेलुगूमध्ये ६४.५ कोटी रुपये, हिंदी भाषेत २४ कोटी, मल्याळम २.२ कोटी, तमिळ चार कोटी आणि कन्नड भाषेत ३० लाख रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटाने जगभरात तब्बल १८० कोटी रुपये कमावले आहेत.

अभिनेत्री रेशम टिपणीसची मुलं काय काम करतात? अभिनेत्री म्हणाली, "मुलगा ग्राफिक्स डिझायनर, तर मुलगी..."

'कल्की 2898 एडी' ने प्रभासच्याच चित्रपटांचे मोडले रेकॉर्ड्स

'कल्की 2898 एडी'ने पहिल्याच दिवशी ९५ कोटींची कमाई करून अनेक चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले आहेत. प्रभासच्या चित्रपटाने त्याच्याच्या सालार – ९०.७ कोटी, साहो – ८९ कोटी आणि आदिपुरुष – ८६.७५ कोटी या चित्रपटांचे पहिल्या दिवसाच्या कलेक्शनचे रेकॉर्ड मोडले आहेत. पण, हा चित्रपट 'आरआरआर', 'बाहुबली' आणि 'केजीएफ'चे ओपनिंग डे कलेक्शन रेकॉर्ड मोडू शकला नाही.

"तिचे खूप उपकार, तिच्यामुळेच करिअर करू शकलो"; नाना पाटेकर यांचं पत्नीबद्दल वक्तव्य, वेगळं राहण्याबाबत म्हणाले...

'कल्की 2898 एडी'ने बॉक्स ऑफिसवरील दुष्काळ संपवला आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. हा चित्रपट देशात ९५ कोटी कमवून यंदाचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. त्याआधी हृतिक रोशनच्या 'फायटर'ने पहिल्या दिवशी सर्वाधिक २२ कोटींचा गल्ला जमवला होता. दोन दिवस वीकेंड असल्याने 'कल्की 2898 एडी' चित्रपट किती कमाई करतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

# जेवणानंतर ग्रीन टी प्यायल्याने झपाट्याने वजन कमी होऊ शकते?





वाढते वजन ही एक सामान्य समस्या झाली आहे. सगळे जण वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येत आहे. या समस्येतून लवकरात लवकर बाहेर पडण्यासाठी लोक नानाविध घरगुती उपायसुद्धा वापरताना दिसतात. तुम्हाला माहीत आहेच की, वजनवाढीच्या समस्येला चुकीची आहारशैली, झोपेची चुकीची वेळ आणि आपल्याच काही वाईट व अनारोग्यकारक सवयी कारणीभूत असतात.

वजन वाढल्यानंतर आपल्याला अनेकांकडून ग्रीन टी पिण्याचा सल्ला दिला जातो. विशेष म्हणजे ग्रीन टी हे पाण्यानंतर जगभरातील सर्वांत प्रसिद्ध पेय बनलं आहे. ग्रीन टीमध्ये न्यूट्रिशन आणि अँटीऑक्सिडंट्स घटक असतात. ग्रीन टी आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असून, त्यामुळे अनेक समस्यांपासून सुटका होते. ग्रीन टीमुळे चयापचय सुधारते, पचन चांगल्या प्रकारे होऊन वजन कमी होण्यासही मदत होते. ग्रीन टी पिण्याचे प्रमाण, तसेच वेळ यांबाबत योग्य काळजी घेतल्यास तुम्हाला ग्रीन टीचा भरपूर लाभ घेता येऊ शकतो. जेवल्यानंतर ग्रीन टी प्यायल्यास झपाट्याने वजन कमी होऊ शकते का, याच विषयावर मुंबई येथील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलच्या सल्लागार व आहारतज्ज्ञ प्रतीक्षा कदम यांनी माहिती दिल्याचे वृत्त प्रतीक्षा कदम यांनी दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. आपण त्याबाबत सविस्तर जाणून घेऊ.

डॉक्टर म्हणतात, "मागील काही वर्षांपासून कित्येक जण हे आरोग्याविषयी जागरूक झाले आहेत. त्यामुळे अनेकांनी ग्रीन टी पिण्याला आपल्या आयुष्यातील अविभाज्य भाग बनविले आहे. ग्रीन टी हे आरोग्यदायी पेय आहे. ग्रीन टीमध्ये कॅफिन असते. ग्रीन टीमध्ये अनेक पोषक घटकांचा समावेश असतो. हे पोषक घटक आपल्याला दिवसभर ताजेतवाने राहण्यास मदत करतात. ग्रीन टीमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात. त्यामध्ये वजन कमी करण्यासोबतच हृदयविकार, त्वचेच्या समस्या आदी अनेक बाबींमध्ये ग्रीन टी फायदेशीर ठरते."

जेवणानंतर लगेच ग्रीन टी प्यायल्याने वजन कमी होण्यास गती मिळते. या कल्पनेमागील विश्वास ग्रीन टीमधील कॅटेचिन नावाच्या उच्च सामग्रीमुळे मिळतो. विशेषत: एपिगॅलोकेटचिन गॅलेट (EGCG) व कॅफीन हे घटक चरबी जाळतात आणि चयापचय दर वाढवितात, असे मानले जाते. तथापि, या प्रक्रियेस वेळ लागतो. असे म्हटले जाते की, संशोधनाने हे सिद्ध केले आहे की, ग्रीन टी पिण्याने लोकांचे वजन कमी होण्यास मदत होते; पण याबरोबरच व्यायाम आणि निरोगी आहार घेतला पाहिजे.

संशोधनात असे दिसून आले आहे की, दीर्घकाळपर्यंत ग्रीन टी घेतल्याने त्याद्वारे कॅफिन व कॅटेचिन या दोन्ही घटकांमुळे चयापचय गती वाढू शकते. कॅटेचिनमुळे अतिरिक्त चरबी कमी करण्यास मदत होऊ शकते. कॅटेचिन व कॅफिन दोन्ही घटक शरीर वापरत असलेली ऊर्जा वाढवू शकतात. २०१० मध्ये केलेल्या पुनरावलोकनात असे आढळून आले आहे की, ग्रीन टी या आरोग्यपूरक पेयामध्ये कॅटेचिन किंवा कॅफिन आहे. या घटकांचा वजन कमी करणे आणि वजन व्यवस्थापन करणे यावर लहान, परंतु सकारात्मक प्रभाव पडतो.

# "एका क्षणी असं वाटलेलं...", रोहित शर्माने व्यक्त केली भीती

टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत भारतीय संघाने इंग्लंडवर मात करत अंतिम फेरीत धडक दिली आहे. या सामन्यात भारताच्या फिरकीपटूंनी जबरदस्त गोलंदाजी करत इंग्लंडचं कंबरडं मोडलं. जॉस बटलर, हॅरी ब्रूक व जोफ्रा आर्चर वगळता एकाही इंग्लिश फलंदाजाला भारतीय गोलंदाजांसमोर फार काळ मैदानावर उभं राहता आलं नाही. अक्षर पटेल (३ बळी) आणि कुलदीप यादव (३ बळी) या दोन्ही फिरकीपटूंनी भारताच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. तर रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांच्या भागीदारीमुळे भारत एक चांगली धावसंख्या उभारू शकला होता. इंग्लंडवर भारतीय संघाने एकतर्फी विजय मिळवला आणि या विजयासह भारताने १० वर्षांनंतर टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली. यापूर्वी २०१४ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघ अंतिम फेरीत पोहोचला होता. त्या सामन्यात श्रीलंकेने भारतावर सहा गडी राखून मात करत विश्वचषक उंचावला होता.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाने निर्धारित २० षटकांत ७ गड्यांच्या बदल्यात १७१ धावा जमवल्या होत्या. यादरम्यान रोहित शर्माने ३९ चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांसह ५७ धावा फटकावल्या तर, सूर्यकुमार यादवने ३६ चेंडूत ४७ धावांचं योगदान दिलं. हार्दिक पांड्यानेही १३ चेंडूत २३ धावा केल्या. त्याचवेळी रवींद्र जडेजाने १७ धावांची नाबाद खेळी केली. त्यानंतर, १७२ धावांचं लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या इंग्लंडच्या संघाला केवळ १०३ दावांपर्यंत मजल मारता आली आणि भारताने इंग्लंडवर ६८ धावांनी मात केली.

या विजयानंतर समालोचकांशी बातचीत करताना भारताचा कर्णधार रोहित शर्मा म्हणाला, "हा विजय खूप समाधान देणारा आहे. एक संघ म्हणून आम्ही खूप मेहनत केली आणि सर्वांनी त्यांचं पूर्ण योगदान दिलं. सर्व गोष्टी जुळून आल्या होत्या. पाऊस आणि इतर कारणांमुळे परिस्थिती खूप आव्हानात्मक होती. परंतु, गोलंदाज आणि फलंदाजांनी जुळवून घेतल्यास सगळं काही आपल्या योजनेप्रमाणे घडतं."

"आम्ही फलंदाजी करत असताना एका क्षणी असं वाटलेलं की, आमच्या १४० ते १५० धावा होतील. परंतु, मधल्या षटकांमध्ये सूर्यकुमार आणि मला काही चांगले फटके खेळता आले. त्यामुळे २० ते २५ धावा वाढवण्यास मदत झाली. अशा खेळपट्टीवर १७१ ही खूप चांगली धावसंख्या होती. कारण आमचे गोलंदाज चांगली कामगिरी करत आहेत. अशा खेळपट्टीवर अक्षर आणि कुलदीप एखाद्या बंदुकीसारखे आहेत. दबावाखाली ते शांत होते. पहिल्या डावानंतर आमच्या गप्पा झाल्या. स्टम्प्ससमोर (यष्टी) गोलंदाजी करायची हे ठरलं होतं आणि आमच्या गोलंदाजांनी ती कामगिरी चोख केली."

रोहित म्हणाला, मी माझ्या मनात एक लक्ष्य निश्चित करतो. मात्र मी ते इतरांना कळू देत नाही. माझ्या सहकाऱ्यांनाही सांगण्याची गरज भासत नाही, कारण तेही उत्कृष्ट खेळाडू आहेत. त्यात १७१ ही खूप चांगली धावसंख्या उभारली होती.

# दिनविशेष

**घटना**

१९९८: संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्काविषयक सार्वत्रिक जाहीरनाम्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली.
१९९७: मुष्टियुद्धात इव्हांडर होलिफील्डच्या कानाचा चावून तुकडा तोडल्यामुळे माइक टायसनला निलंबित करून होलिफील्डला विजेते घोषित करण्यात आले.
१९९४: विश्वकरंडक फूटबॉल स्पर्धेत रशियाच्या ओलेम सेलेन्को याने कॅमेरुनविरुद्ध पाच गोल करुन ऐतिहासिक कामगिरी केली.
१९८७ : लष्करी इतिहासात प्रथमच, इराकी युद्ध विमानांनी इराणच्या सरदश्त शहरावर बॉम्बफेक करून रासायनिक हल्ल्यासाठी नागरी लोकसंख्येला लक्ष्य करण्यात आले.
१९७८ : अमेरिका - सर्वोच्च न्यायालयाने महाविद्यालयातील प्रवेशात आरक्षण बेकायदा ठरवले.
१९७२: दुसऱ्या भारत-पाक युद्धानंतर सिमला परिषदेस प्रारंभ झाला.

**जन्म**

१९७०: मुश्ताक अहमद पाकिस्तानी क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक
१९५९ : टी. पी. राजीवन भारतीय कादंबरीकार (निधन: २ नोव्हेंबर २०२२)
१९३७: डॉ.गंगाधर पानतावणे - साहित्यिक समीक्षक, अस्मितादर्श या त्रैमासिकाचे संस्थापक संपादक
१९३४: रॉय गिलख्रिस्ट - वेस्टइंडीजचे क्रिकेटपटू (निधन: १८ जुलै २००१)
१९२८: बाबूराव सडवेलकर चित्रकार, महाराष्ट्राचे कला संचालक (निधन: २३ नोव्हेंबर २०००)
१९२६: रॉबर्ट लिडले - सीटी स्कॅनचे शोधक (निधन: २४ जुलै २०१२)
१९२१ : पी. व्ही. नरसिम्हा राव भारताचे ९वे पंतप्रधान (निधन २३ डिसेंबर २००४)

**निधन**

२०२२ : टी. शिवदासा मेनन भारतीय राजकारणी, केरळचे आमदार (जन्म: १४ जून १९३२)
२०२२ : पालोनजी मिस्त्री भारतीय वंशाचे आयरिश उद्योगपती, शापूरजी पालनजी समूहाचे अध्यक्ष पद्म भूषण (जन्म: १ जून १९२९)
२०२२: वरिंदर सिंग - भारतीय फील्ड हॉकी खेळाडू - ऑलिम्पिक कांस्यपदक, ध्यानचंद खेलरत्न (जन्म: १६ मे १९४७)
२०२० : गीता नागाभूषण भारतीय कन्नड स्त्रीवादी लेखक साहित्य अकादमी पुरस्कार (जन्म: २ मार्च १९४२)
२००९ : ए. के. लोहितदास
२००७ : यूजीन बी. फ्लकी
भारतीय दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक (जन्म: ६ मे १९५५)

# शिवानी सुर्वेचं जोरदार पुनरागमन!

'स्टार प्रवाह' वाहिनीवर तब्बल १२ वर्षांनी अभिनेत्री शिवानी सुर्वेने जोरदार पुनरागमन केलं आहे. ती सध्या 'थोडं तुझं आणि थोडं माझं' या मालिकेत झळकत आहे. दर आठवड्याला टीआरपीच्या शर्यतीत कोणती मालिका बाजी मारणार याची उत्सुकता प्रेक्षकांच्या मनात कायम असते. नेहमीप्रमाणे या यादीत जुई गडकरीची 'ठरलं तर मग' मालिका यंदाही अव्वलस्थानी आहे. परंतु, हे पहिलं स्थान सोडल्यास त्यानंतरच्या क्रमवारीत मोठा उलटफेर झाला आहे.

अभिनेत्री शिवानी सुर्वेची 'थोडं तुझं आणि थोडं माझं' ही मालिका १७ जूनपासून प्रेक्षकांच्या भेटीला आली. लोकप्रिय अभिनेत्रीचं पुनरागमन असल्याने या मालिकेकडून प्रेक्षकांना बऱ्याच अपेक्षा होत्या आणि त्यानुसार टीआरपीच्या यादीचं संपूर्ण चित्र पहिल्याच आठवड्यात पालटलं. शिवानीने जोरदार पुनरागमन करत टीआरपीच्या यादीत मोठी झेप घेतली आहे. पहिल्याच आठवड्यात अभिनेत्रीच्या मालिकेने टीआरपीच्या यादीत थेट दुसरं स्थान गाठलं आहे.

'कला', 'मुक्ता', 'जानकी' या सगळ्यांना मागे काढत 'मानसी'ने दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. आता येत्या आठवड्यात शिवानीची मालिका सायलीच्या 'ठरलं तर मग'ला टक्कर देणार असं चित्र नुकत्याच समोर आलेल्या टीआरपीच्या यादीत पाहायला मिळत आहे. ६.९ रेटिंगसह 'ठरलं तर मग' पहिल्या स्थानी आहे. तर, 'थोडं तुझं आणि थोडं माझं' या मालिकेला पहिल्याच आठवड्यात ६.८ रेटिंग मिळालं आहे.

# राशि भविष्य

**मेष** मुलांच्या सहवासात मनाचा दिलासा शोधा. कुटुंबातील मुलांची ही अनोखी उपचार पद्धती इतरांच्या मुलांमध्ये देखील आढळते. त्यातून आपणास मन:शांती तर मिळेलच, पण तुमच्या व्यग्रता शांत करेल. विचार न करता कुणाला ही आपला पैसा देऊ नका तुम्हाला येणाऱ्या काळात मोठी समस्या येऊ शकते.

**वृषभ** तुमच्या प्रकृतीची चिंता सोडा. आजारावर जालीम लसीकरण लाभदायी ठरते. तुमचा योग्य दृष्टिकोन चुकीच्या दृष्टिकोनावर मात करतो. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल.

**मिथुन** तुमच्याकडे प्रचंड प्रमाणात ऊर्जा आहे - परंतु कामाच्या ताणामुळे तुम्ही त्रासून जाल. जवळच्या नातेवाईकाकडे जाणे आज तुमच्या आर्थिक स्थितीला बिघडवू शकते. कुटुंबीय आणि मित्रांबरोबर आनंदी क्षण मिळवाल. थोड्या फार अडचणींच्या व्यतिरिक्त ही आज तुमचे प्रेम जीवन चांगले राहील आणि तुम्ही आपल्या जोडीदाराला खुश ठेवण्यात यशस्वी व्हाल.

**कर्क** मुलं तुमच्या आवडीनुसार वागणार नाहीत, त्यामुळे तुम्ही उद्विग्न व्हाल. तुमचा अनियंत्रित राग सर्वांना त्रासदायक ठरु शकतो. कोपिष्ट व्यक्तीची ऊर्जा वाया जाते आणि निर्णय क्षमतेला खीळ घालते. म्हणून तुम्ही तुमच्या रागावर नियंत्रण मिळविणे गरजेचे आहे. अन्यथा गोष्टी आणखी अवघड होतात.

**सिंह** अवघडेलपण, असुविधा तुम्हाला मानसिक त्रास देऊ शकतात, पण मित्रांच्या भरपूर मदतीमुळे तुमच्या अडचणी दूर होतील. तणाव दूर घालविण्यासाठी एखादे छानसे संगीत ऐका. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल.

**कन्या** प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. परंतु स्वार्थी व लगेच चिडणाऱ्या व्यक्तीला टाळा, कारण ती व्यक्ती तुम्हाला तणावात टाकू शकते - परिणामी समस्या अधिकच गंभीर रूप धारण करू शकेल. महत्त्वाच्या व्यक्ती कधीही आर्थिक मदत द्यायला तयार असतील. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसमवेत वेळ घालवला नाहीत - तर घरात समस्या उद्भवू शकते.

**तूळ** आज तुम्ही एकदम शांततेत राहाल आणि मौजमजा करण्याचा तुमचा मूड बनेल. पारंपरिक पद्धतीच्या गुंतवणूक योजनेत तुमचे बचतीचे पैसे गुंतवलेत तर पैसा कमावू शकाल. कुटुंबातील सदस्यांच्या आनंदी स्वभावामुळे घरातील वातावरण उत्फूल्ल होईल. कामदेवाच्या कचाट्यातून सुटण्याची अगदी लहानशी संधी मिळेल.

**वृश्चिक** कदाचित आपणास अडचणींचा सामना करावा लागू शकतो, त्यामुळे आपले संतुलन ढळू देऊ नका. अन्यथा तुम्ही गंभीर संकटात अडकाल. विशेषत: आपल्या रागावर नियंत्रण मिळवा, कारण तो एक प्रकारचा वेडेपणाच आहे. चांगली गुंतवणूक फक्त परतावा मिळवून देतील - त्यामुळे तुमच्या कष्टाचे पैसे गुंतवताना नीट विचार करा.

**धनु** आपल्या पालकांकडे दुर्लक्ष करणे हे आपल्या भविष्यातील प्रगतीसाठी मारक असेल. चांगला काळ सदैव टिकून रहात नाही. माणसाच्या गरजा या ध्वनीलहरींप्रमाणे असतात. त्यांच्या उतारचढावामुळे कधी मधुर संगीत निर्माण होते तर कधी कर्कश आवाज. आपण जसे पेरु तसेच उगवते हे लक्षात ठेवा.

**मकर** अति चिंतेने आणि तणावामुळे हायपरटेन्शन वाढेल. इतर दिवसांपेक्षा आजचा दिवस आर्थिक दृष्टीने चांगला राहील आणि तुम्हाला पर्याप्त धन प्राप्ती होईल. कुटुंबाबरोबरचे संबंध आणि स्नेह नव्याने दृढ करण्याचा दिवस. प्रेमी युगुलांनी आपल्या कुटुंबांच्या भावनाचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे.

**कुंभ** प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. तुम्ही अतिशय उत्साहपूर्ण नवीन परिस्थितीचा अनुभव घ्याल - त्यामुळे तुम्हाला आर्थिक फायदा संभवतो. तुमचे व्यक्तिमत्व आणि मोहक आकर्षकता यामुळे काही नवे मित्र जोडाल. तुम्हाला आनंदी ठेवण्यासाठी तुमची प्रिय व्यक्ती काहीतरी करेल.

**मीन** तुमची देण्याची वृत्ती म्हणजे अप्रत्यक्ष मदत करण्याची वृत्ती होय. त्यामुळे शंका, निरुत्साह, अश्रद्धा, मत्सर, हेवा, गर्व यापासून तुम्ही मुक्त व्हाल. आपल्या धनाचा संचय कसा करावा याचे कौशल्य आज तुम्ही शिकू शकतात आणि याच कौशल्याला शिकून तुम्ही आपले धन वाचवू शकतात.

# तनय लाड थायलंडमध्ये ओशियन मॅन ज्युनियर स्पर्धेत कास्य पदक विजेता!

● अलिबाग - क्राबी, थायलंड येथे आयोजित दोन किलोमीटर ओपन वॉटर स्विमिंग ओशियन मॅन स्पर्धेत तनय तुषार लाड यांनी १२ वर्षांखालील आणि ज्युनियर गटात 34.13 min मध्ये पूर्ण करुन कास्य पदक जिंकून भारताचे नाव उंचावले आहे. तनयच्या या यशस्वी कामगिरीमुळे केवळ त्याच्या कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे अभिमान वाढला आहे.

थायलंडमधील क्राबी हे सुंदर किनारे आणि स्वच्छ पाणी यांसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी झालेल्या स्पर्धेत तनयने कास्य पदक मिळवून भारताची मान उंचावली. त्याच्या या कामगिरीने भारतातील जलतरण क्षेत्रात एक नवा आत्मविश्वास निर्माण केला आहे.

ओपन वॉटर स्विमिंग हे अत्यंत कठीण व धाडसाचे क्रीडाप्रकार आहे. समुद्राच्या अनिश्चित लाटांसोबत लढत, सतत बदलणारे हवामान आणि जलचरांचा सामना करत, हा स्पर्धक प्रत्येक क्षणी जिंकण्याच्या जिद्दीने पोहत असतो. तनयने या सगळ्या आव्हानांना समर्थपणे तोंड दिले.

तसेच याआधी त्याने कोची, केरळ येथे पेरियार नदीत आयोजित ६ किमी रिव्हर स्विमथॉन स्पर्धेत सहभाग घेतला होता आणि आपल्या जलतरण कौशल्यांचे प्रदर्शन केले. या स्पर्धेत १२ वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक आणि ज्युनियर गटात द्वितीय उपविजेतपद मिळवून तनय याने सर्वांचे लक्ष वेधून घेतल. त्यांनी हे अंतर 1 तास 31 मी मध्ये पूर्ण केले.तनयच्या या यशामागे त्याची कठोर मेहनत आणि मानसिक तयारी केली होती. कठोर परिश्रम, नियमित सराव आणि आत्मविश्वासाच्या



जोरावर त्याने हे यश संपादन केले आहे. त्याच्या यशामुळे त्याने आपले कौशल्य, मेहनत आणि चिकाटी यांचे उत्तम उदाहरण सादर केले आहे..

त्याची आत्तापर्यंती उल्लेखनीय कामगिरी खालील प्रमाणे

सिंधुदुर्ग जिल्हा असोसिएशन चिवला बीच इथे २२ डिसेंबर २०२२ १ किलोमीटर स्पर्धेत रौप्य पदक

मुंबई येथील स्पर्धेत सनक्रॉक ते गेटवे २०२३ तिसरे स्थान

कोल्हापूर रंकाळा येथील स्पर्धेत २०२३ द्वितीय क्रमांक

पलावा इथे झालेल्या महाराष्ट्र ट्रायथलॉन स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक

• सिंधुदुर्ग जिल्हा असोसिएशन चिवला बीच इथे झालेलया डिसेंबर २०२३ दोन किमी तिसरे आणि १० किमी चौथे स्थान

• विजयदुर्ग इथे झालेलया खाडीतील २ किमी स्पर्धेत द्वितीय स्थान

त्याच्या प्रशिक्षकांचेही या यशात मोलाचे योगदान आहे तो सध्या सागरकन्या रुपाली रेपाळे आणि अनिरुद्ध महाडिक यांच्याकडे स्वामिंग प्रशिक्षण घेत आहे .. रुपाली रेपाळे या ओपन-वॉटर लांब-अंतर जलतरणपटू आणि ट्रायथलीट आहे. त्यांनी त्यांच्या पोहण्याच्या कारकिर्दीत सोलो स्विम प्रकारात सात सामुद्रधुनी पोहून विशेष विक्रम केला आहे, त्यामध्ये इंग्लिश चॅनल, जिब्राल्टर सामुद्रधुनी , पाल्क स्ट्रेट , बास स्ट्रेट , कुक स्ट्रेट , रॉबेन आयलंड चॅनल आणि मुंबई-धरमतर चॅनेल पार केले आहेत , त्या सध्या डोंबिवली पलावा येथील ऑलिम्पिक स्पोर्ट सेंटर येथे रुपाली रेपाळे स्विमिंग अकादमी मध्ये प्रशिक्षण देत आहेत.

तनयच्या या यशाबद्दल त्याचे आणि त्याच्या कुटुंबीय आणि त्याच्या प्रशिक्षकांचेही हार्दिक अभिनंदन आणि उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा!

## कोटमगाव येथील श्री जगदंबा देवस्थानच्या विकासासाठी आवश्यक कार्यवाही गतीने करावी - उपमुख्यमंत्री अजित पवार



● मुंबई : नाशिक जिल्ह्याच्या येवला तालुक्यामधील कोटमगाव येथील श्री जगदंबा देवस्थान तीर्थक्षेत्रास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेंतर्गत 'ब' वर्ग दर्जा देण्यात आला आहे. येथे नवरात्र उत्सवासह वर्षभर देखील भाविक मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी येतात. या भाविकांना आवश्यक सोयीसुविधा प्राप्त व्हाव्यात यासाठी परिसर विकास आराखड्याच्या अंमलबजावणीची कार्यवाही गतीने करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी आज विधिमंडळातील समिती कक्षात श्री जगदंबा देवस्थान (ता. येवला) तीर्थक्षेत्र विकास आराखड्याबाबत बैठक घेतली. यावेळी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, ग्रामविकास विभागाचे सहसचिव काळू वळवी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, कोटमगाव येथील श्री जगदंबा देवस्थान येथे नवरात्र उत्सवात विविध भागांतून येणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीय असते. भाविकांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी परिसराच्या विकास आराखड्याचा प्रस्ताव ग्रामविकास विभागाने त्रुटींची पूर्तता करून घेऊन नियोजन विभागाकडे पाठवावा. नाशिकच्या पालकमंत्र्यांनी देखील याबाबतची बैठक घ्यावी, असे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

## माथाडी कायद्याची अंमलबजावणी करा, नाहीतर मंत्रालयावर मोर्चा काढणार

### डॉ. बाबा आढाव यांचा राज्य सरकारला इशारा



● पुणे : हमाल, कष्टकरी माथाडी कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी. अन्यथा राज्यभरातील कष्टकऱ्यांकडून मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी दिला. महामंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी डॉ. आढाव बोलत होते. मुंबईत चार महिन्यापूर्वी केलेल्या बेमुदत उपोषणावेळी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या लेखी आश्वासनाची अद्याप पूर्तता झालेली नाही. माथाडी कायद्याची राज्यात अंमलबजावणी न झाल्याने राज्यातील हमाल कष्टकऱ्यांना पुन्हा रस्त्यावर उतरावे लागेल. सरकारने परिणामाना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असे डॉ. आढाव यांनी सांगितले.

महामंडळाचे सरचिटणीस सुभाष लोमटे, उपाध्यक्ष राजकुमार घायाळ, विकास मगदूम, सहचिटणीस अप्पा खताळ, हनुमंत बहिरट, शिवाजी शिंदे, संतोष नांगरे, गोरख मेंगडे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते बैठकीस उपस्थित होते. यावेळी जिल्हास्तरीय माथाडी मंडळे शंभर टक्के ठप्प झाली असून, कायदेशीर प्रश्न मार्गी लावले जात नसल्याच्या तक्रारी कार्यकर्त्यांनी बैठकीत केल्या.

## पुण्यातील ससून रुग्णालय व ड्रग्जचे काय नाते आहे ? : नाना पटोले

■ राज्यातील तरुणपिढीला बरबाद करणारे ड्रग्ज महाराष्ट्रात येते कुठून?
■ शैक्षणिक व सांस्कृतिक पुणे शहराच्या लौकिकाला काळिमा फासण्याचे पाप.

● मुंबई - पुणे शहराचा शैक्षणिक व सांस्कृतिक नगरी असा नावलौकिक आहे परंतु मागील काही वर्षापासून पुण्याच्या या नावलौकिकाला काळीमा फासला जात आहे. ड्रग्जचा काळाबाजार सुरु असून तरुण पिढी त्यात बरबाद होत आहे. पोर्शे कार दुर्घटनेनंतर ड्रग्ज व ससून रुग्णालय पुन्हा चर्चेत आले आहे. याआधी ड्रग्ज माफिया ललित पाटीलला याच ससून रुग्णालयात व्हीआयपी ट्रिटमेंट मिळाल्याचे उघड झाले आहे. ससूनमध्ये सरकारच्या आशिर्वादाने अनेक विद्वान लोक बसले आहेत, असा घणाघाती आरोप करत ससून रुग्णालय व ड्रग्जचे काय नाते आहे ? असा संतप्त सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे.

विधिमंडळात पुण्यातील पोर्शे कार अपघाताच्या मुद्यावर बोलताना नाना पटोले पुढे म्हणाले की, पोर्शे कार दुर्घटनेतील आरोपीसंदर्भात फक्त दारु पिऊन भरधाव वेगाने गाडी चालवून दोघांना चिरडले एवढाच मुददा नाही तर त्यात ड्रग्जचा पण संबंध आला आहे. आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलले गेले. कोण डॉक्टर अजय तावरे? त्याला कोणाचा आशिर्वाद आहे. या प्रकरणात आरोपीला वाचवण्यासाठी कोणाचा राजकीय दबाव होता. फॉरेन्सिक लॅबचा उल्लेख झाला पण अजून त्याचा रिपोर्टच आला नाही तरीही क्लिन चिट देऊन टाकली गेली. ड्रग्जचा मुद्दा महत्वाचा आहे, हे ड्रग्ज महाराष्ट्रात गुजरातच्या मुंद्रा बंदरातून येते हे सर्वांना माहित आहे. आणि या ड्रग्जच्या विळख्यात तरुणपिढी बरबाद केली जात आहे. महाराष्ट्राला हा कलंक लागला आहे, यावर गृहमंत्री यांनी सभागृहात उत्तरे दिली पाहिजेत अशी मागणी नाना पटोले यांनी केली.

यावर उत्तर देताना गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पुण्यातील ससून रुग्णालयातील डॉक्टर अजय तावरे, श्रीहरी हळनोर आणि शिपाई अतुल घटकांबळे यांच्यावर सरकारने तात्काळ कारवाई केली आहे. तरुण पिढीला ड्रग्जचा विळखा लावण्याचा प्रयत्न चालला आहे.

## चिल्ड्रेन ऐड सोसायटीमधील उन्हाळी सुट्टीत घरी न जाऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष उन्हाळी शिबिरे उपक्रम राज्यभर राबवावा - मंत्री आदिती तटकरे



● मुंबई :- महिला व बाल विकास विभागाच्या चिल्ड्रेन ऐड सोसायटीमधील जे विद्यार्थी उन्हाळी सुट्टीत घरी जाऊ शकत नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी विशेष उन्हाळी शिबिरांचे आयोजन करावे. त्याचप्रमाणे हा उपक्रम राज्याच्या सर्व विभागात राबविण्यात यावा, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून 10 वी, 12वी तसेच व्यवसाय प्रशिक्षणात उत्कृष्ट गुण प्राप्त केलेले विद्यार्थी तसेच पॅराऑलिंपिक खेळामध्ये पदक प्राप्त केलेल्या खेळाडूचा सत्कार मंत्री कु. तटकरे यांच्या हस्ते आज चिल्ड्रेन ऐड सोसायटी, माध्यमिक शाळा, मानखुर्द येथे करण्यात आला. या गुणगौरव सोहळ्याला विभागीय उपायुक्त सुवर्णा पवार, मुख्याधिकारी बापूराव भवाने, प्रकल्प बालविकास अधिकारी श्रीमती प्रेमा घाटगे, शरद कुऱ्हाडे तसेच इतर अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते. राज्यातील कोकण विभाग आणि विशेषतः दहावी, बारावीतील विद्यार्थिनी ह्या नेहमी परीक्षेत अव्वल असतात, असे सांगून मंत्री कु.तटकरे यांनी सोसायटीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## Minister Al Zeyoudi visits Silicon Valley to strengthen UAE-US ties in technology, innovation sectors

● Dubai : Dr. Thani bin Ahmed Al Zeyoudi, Minister of State for Foreign Trade, has concluded a visit to San Francisco and nearby Silicon Valley, which was aimed at boosting economic cooperation and exploring partnerships between the UAE and the United States, especially in advanced technology.



Dr. Thani held several discussions with stakeholders, leading technology companies, and local entrepreneurs, during which he sought to identify potential partnerships in high-priority fields such as artificial intelligence (AI), machine learning, and climate tech. In his meetings, the minister outlined the UAE's advanced technology ambitions and investment-friendly business environment, extending an invitation to US investors, start-ups, and skilled professionals to explore its expansion opportunities.

Discussions focused on joint projects, research collaboration, and exchanging knowledge and expertise in cutting-edge disciplines such as AI, data analytics and sustainable technologies.

Dr. Al Zeyoudi's visit to the US underlines the UAE's commitment to securing global partnerships to accelerate its industrial and technological capabilities, and to further bolstering the nation's position as a destination for investment and innovation.

Of the visit, the minister remarked, "The West Coast of the US is the global epicentre of technology and innovation, and the UAE has much to gain from closer ties to Silicon Valley's vibrant ecosystem. This visit is an important part of our efforts to establish long-standing partnerships at both the private-sector, public-sector and academic levels to leverage their knowledge and experience and accelerate the UAE's technological capabilities. Technology is a key pillar of our economic growth and diversification agenda and it's vital we can build productive and mutually beneficial relations with the world's leading exponents."

The United States is the UAE's third-largest trading partner globally, accounting for 5.6 per cent of the UAE's total non-oil trade. The UAE is America's most important trading partner in the Arab

## महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील विविध प्रश्नांचा आढावा



● मुंबई : महसूल मंत्री तथा पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील विविध विषयांवरील आढावा बैठक विधान भवनात झाली. या बैठकीत जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करून त्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात आले.

या बैठकीत सिल्लोड तालुका दूध संघाने महानंदासोबत सदस्यत्व देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सिल्लोड तालुक्यातील सोयगाव पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच जिल्ह्यातील महसूल आणि पशुसंवर्धन विभागाशी निगडित इतर महत्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. मंत्री श्री. विखे पाटील यांनी छत्रपती संभाजी नगर मधील सर्व समस्यांचा आढावा घेत त्या तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिले.

या बैठकीसाठी पणन व अल्पसंख्याक विकास विभाग मंत्री अब्दुल सत्तार, महसूल विभागाचे अपर सचिव राजेशकुमार, महानंदाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर तर दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आणि पोलीस अधीक्षक मनीष कलवाणीया उपस्थित होते.

## Dairy Farmers Protest Outside Assembly, Throw Milk on Road Demanding Price Hike of Up to Rs 40 Per Liter

● In recent days, dairy farmers have been protesting against the state government, demanding a ₹40 per liter increase in milk prices. Farmers, along with Vijay Wadettiwar's support, have gathered outside the legislative assembly to voice their grievances. To show their discontent They threw gallons filled with milks on road. Wadettiwar has accused the government of imposing GST on milk, which has fueled



discontent among farmers. The perceived lack of seriousness from the state government in addressing their demands has escalated the situation, leading to the 'Kisan Sabha' organizing a statewide protest.

Milk producers are facing losses of ₹10 to ₹15 per liter. It is suggested that the government should set a minimum price of 40 rupees for milk as announced in the Nagpur Session, reintroduce milk subsidies, raise the subsidy to 10 rupees per liter due to rising production costs and losses, provide subsidies to farmers who continue to produce milk even after the subsidy is discontinued, among other measures. This has been recommended by the committee. Farmers are escalating their call for higher milk prices, staging a 'Rasta Roko' protest on the Kolhar Ghoti highway in Ahmednagar district. A similar demonstration took place in Chikhali village of Sangamner taluka. In Ahmednagar district, Dairy Development Minister Radhakrishna Vikhe Patil is facing the growing demands of farmers for increased milk prices. Farmers are preparing to protest and urge for a subsidy of at least 40 per liter for milk.

## Samastipur division imposed fines on 2.09 lakh erring train passengers

● Patna - The Samastipur division of Indian Railways, which is carrying out a drive against ticketless travel by passengers, imposed fines on 2.09 lakh people.

The Divisional Railway Manager (DRM) Samastipur released data till June 25 and said the department collected fines to the tune of Rs 15.5 crore from 2.09 lakh passengers in the first three months of the financial year 2024-25.

The officials have formed special teams in almost all the railway sections of this division to clamp down on ticketless travel. "We have been carrying out a ticket checking campaign for the last few months and we will continue the same in the future. In such a situation, railway passengers need to be alert," said Vinay Srivastava, DRM, Samastipur division




of East Central Railway.

The official said one should not travel in AC coaches without proper tickets and travelling without a ticket is a crime. There are also fines for adults travelling on a child's ticket, smoking on the train and chain pulling without reason.

Disclaimer: This post has been auto-published from an agency feed without any modifications to the text and has not been reviewed by an editor

# नीट पेपरफुटी प्रकरणात दोघांना अटक



● पाटणा, प्रतिनिधी :

नीट परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि पेपरफुटी प्रकरणाचा सीबीआयकडून तपास सुरू आहे. सीबीआयने गुरुवारी याप्रकरणी दोघांना अटक केली आहे. सीबीआयने मनीष कुमार आणि आशुतोष कुमार या दोघांना अटक केली आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने 'एनटीए'ला नोटीस पाठवली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्यावतीने (एनटीए) ५ मे रोजी वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशासाठीची नीट-यूजी परीक्षा घेण्यात आली. देशभरात सुमारे २४ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती.

मात्र, अनेक प्रकारच्या गैरव्यवहाराचे आरोप झाल्याने ही परीक्षा वादग्रस्त ठरली आहे. सीबीआयकडून मनीषला चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. त्यावेळी त्याला अटक केली. दोघांना पाटणा येथे ताब्यात घेतले, असे अधिकाऱ्याने माहिती देताना सांगितले. दोघांना पाटणा येथील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. तसेच त्यांची अधिक चौकशी करण्यासाठी सीबीआय आता न्यायालयाकडे पोलीस कोठडीची मागणी आहे, असे या अधिकाऱ्यांने सांगितले.

मनीष कुमार आणि आशुतोष कुमार यांनी कथितरीत्या वैद्यकीय प्रवेश परीक्षा इच्छुकांना परीक्षेपूर्वी सुरक्षित राहण्याची व्यवस्था केली होती. 'लर्न बॉईज हॉस्टेल आणि प्ले स्कूल' भाड्याने घेतले होते. त्याठिकाणी प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका देण्यात आल्या होत्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, बिहार पोलिसांच्या आर्थिक गुन्हे युनिटने अर्धवट जळालेल्या प्रश्नपत्रिका जप्त केल्या होत्या. पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने कसून चौकशी सुरू केली आहे.

**'एटीए'च्या कार्यालयाला टाळे**

नीट परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि पेपरफुटीप्रकरणी नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय) आणि काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनेच्या सदस्यांनी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एटीए) च्या कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी एटीएच्या कार्यालयाला टाळेठोकले. यावेळी जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी वेळीच पोलीस घटनास्थळी पोहोचले असून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.

**परीक्षेत 'अभ्यासक्रमाबाहेर'चा प्रश्न?**

प्रवेश परीक्षेत 'अभ्यासक्रमाबाहेर'चा प्रश्न असल्याचा आरोप करणाऱ्या नीट उमेदवाराच्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयाने 'एनटीए'ला त्यांची भूमिका स्पष्ट करण्यात सांगितले आहे. याचिकाकर्त्याने दावा केला की भौतिकशास्त्र विभागातील एक प्रश्न 'रेडिओॲक्टिव्हिटी' वर आधारित होता.

### ८ जुलै रोजी सुनावणी

नीट प्रकरणानंतर आणखी एका याचिकेवरून एनटीएला सर्वोच्च न्यायालयाने नोटीस पाठवली आहे. या याचिकेवरही ८ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. न्यायमूर्ती मनोज मिश्रा आणि एसव्हीएन भाटी यांच्या सुट्टीतील खंडपीठाने, खासगी कोचिंग सेंटर आणि काही एनईईटी उमेदवारांनी दाखल केलेल्या नव्या याचिकेवर एनटीएला नोटीस बजावली आहे. ज्यावर न्यायालयाने आपल्या कोणत्या मूलभूत अधिकारांना धक्का बसला आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर याचिकाकर्त्याने, विद्यार्थ्यांनी आमच्या क्लासच्या माध्यमातून अभ्यास केला आहे. त्यामुळे त्यांच्या अधिकारांकडे लक्ष देणे आमचे काम आहे, असे म्हटले.

# पावसाळी अधिवेशन : पहिल्याच दिवशी आ. निकोले आक्रमक

## वाढवण बंदर रद्द, पेसा भरती, शेतमालाला हमी भाव संदर्भात मागण्या

● मुंबई , प्रतिनिधी :

महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले असता पहिल्याच दिवशी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे 128 डहाणू (अ. ज.) विधानसभा आमदार कॉम्रेड विनोद निकोले हे विधानभवनात फलक झळकवत जिल्ह्यातील विविध मागण्यांवर जोरदार आंदोलन केले आहे.

यावेळी आमदार निकोले यांनी आमची एकच जिद्द, वाढवण बंदर रद्द, आदिवासी पेसा भरती झालीच पाहिजे, नोकरी आमच्या हक्काची नाही कोण्याच्या बापाची ! शेतकऱ्यांनी पिकवलेल्या पिकांच्या मालाला हमीभाव द्या ! अश्या जोरदार घोषणाबाजी विधानभवनाच्या पायऱ्यांवर केली. दरम्यान आ. निकोले म्हणाले की, गोरगरीब शेतकऱ्यांच्या शेतात अवधानी खारफुटीचे तिवर झाडे आली तर ती बुजवण्याचा प्रयत्न त्या शेतकऱ्यांनी केला तर त्याच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होतो. इथे तर चक्क समुद्रामध्ये 5000 एकर क्षेत्रात मातीचा भराव करून हे विनाशकारी वाढवण बंदर प्रकल्प बांधण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाने आखला आहे हे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून अतिशय धोक्याचे आहे. तर, आदिवासी भागातील



उच्चशिक्षित मुला-मुलींना रोजगार मिळावा हा त्यांचा हक्क आहे कारण या क्षेत्रामध्ये पेसा कायदा लागू आहे. तसेच, जगाचा पोशिंदा समजला जाणारा शेतकऱ्याला त्यांनी पिकवलेला शेतमालाला हमीभाव मिळत नाही त्यामुळे शेतकरी हा कर्जबाजारी होतोय. त्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव हा मिळालाच पाहिजे, अशी मागणी आमच्या अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने सातत्याने विविध ठिकाणी आंदोलन करून करण्यात येत असते त्याच अनुषंगाने आज ही मागणी आम्ही विधानभवनात करत आहोत, असे आमदार निकोले यांनी सांगितले.

# दुष्काळात पाण्याचा अपव्यय

## काश्यपीतील विसर्ग निम्म्यावर, वहनव्यय वाढणार



● नाशिक, प्रतिनिधी :

गंगापूर धरणातील पाणी उचलण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी पोलीस बंदोबस्तात काश्यपीतून विसर्ग करणाऱ्या पाटबंधारे विभागाने स्थानिकांच्या विरोधानंतर एक पाऊल मागे घेतले आहे. पहिल्या दिवशी ५०० क्युसेकचा विसर्ग आता २२५ क्युसेकवर आणला गेला. ५०० क्युसेक वेगाने गंगापूरमध्ये पाणी येण्यास १२ दिवसांचा कालावधी लागणार होता. त्याचा वेग निम्म्याने कमी केल्याने हा कालावधी दुप्पट होईल. वहनव्यय वाढून पुरेसे पाणी ना गंगापूरमध्ये जाईल, ना धरण परिसरातील गावांना त्याचा उपयोग होईल, अशी विचित्र स्थिती निर्माण होण्याची चिन्हे आहेत. पाटबंधारे विभागाच्या भूमिकेमुळे महापालिकेला गंगापूरमधून पाणी उचलण्यातील अडचणी कायम राहण्याची शक्यता आहे. खालावलेल्या पातळीमुळे गंगापूरमधून पाणी उचलण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या मागणीनुसार स्थानिकांच्या विरोधाला न जुमानता सोमवारी पाटबंधारे विभागाने काश्यपी धरणातून गंगापूरसाठी पाण्याचा विसर्ग सुरू केला. यातून शहरावरील जलसंकट तूर्तास दूर होण्याची शक्यता निर्माण झाली. काश्यपीतून पाणी सोडण्यास स्थानिकांचा विरोध आहे. त्यामुळे विसर्ग करताना पोलीस बंदोबस्त तैनात करावा लागला. संतप्त ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांची भेट घेऊन विसर्ग रोखण्याची मागणी केली होती.

# कोकणाला उत्तम दर्जाचा महामार्ग द्या, अन्यथा कोकणवासीय रस्त्यावर उतरतील !

## मनसेचे वैभव खेडेकर यांचा सरकारला इशारा?

● महाड , प्रतिनिधी :

कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना गेली अठरा वर्षापासून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या खड्ड्यातूनच प्रवास करावा लगत आहे. त्यातच रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणाऱ्या कशेडी बोगद्या मधून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती सुरू झाल्याने या बोगद्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने या याप्रकरणी ठेकेदार व राष्ट्रीय महामार्ग खात्याच्या अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी कोकणातील मनसेचे नेते व खेडचे माजी नगराध्यक्ष वैभव खेडेकर यांनी केली आहे.

रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणाऱ्या नातू नगर येथील कशेडी बोगद्याचे काम अद्याप सुरूच आहे. कांही महिन्यांपूर्वी या बोगद्यातील वाहतूक सुरु केली होती. मात्र बोगद्याला ऐन पावसाळयात मोठ्या प्रमाणावर गळती लागल्याने पाण्याच्या धारा चालू झाल्या आहेत. याबाबत खेडचे माजी नगराध्यक्ष व मनसेचे कोकणचे नेते वैभव खेडेकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कशेडी बोगद्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे असे सांगून ज्या पद्धतीने या बोगदात सुरक्षेच्या उपायोजना करावयास पाहिजे होत्या त्या केल्या गेल्या नाहीत त्यामुळे आज ही परिस्थिती कशेडी बोगदात उद्भवल्याचे वैभव



खेडेकर यांनी सांगितले.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 वरील रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणाऱ्या कशेडी बोगदाच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत जो भ्रष्टाचार झाला आहे व शासनाचे करोडो रुपये खर्च झाले आहेत त्याबाबत संसदेच्या पावसाळी अधिवेशनात कोकणातील लोकप्रतिनिधींनी आवाज उठवावा अशी मागणी देखील मनसेचे नेते वैभव खेडेकर यांनी कोकणातील लोकप्रतिनिधींना केली आहे.

कोकणातील जनतेच्या. माथी निकृष्ट दर्जाच्या महामार्ग केला आहे तसेच निकृष्ट दर्जाच्या कशेडी बोगद्याचे काम केले आहे त्या ऐवजी चांगल्या पद्धतीचा महामार्ग व व चांगल्या पद्धतीच्या बोगद्याचे काम शासनाने ठेकेदारा मार्फत करून घेतले नाही तर कोकणवासीय रस्त्यावर उतरतील असा इशारा मनसेचे नेते वैभव खेडेकर यांनी शासनाला व राष्ट्रीय महामार्ग खात्याच्या अभियंत्यांना दिला आहे.

### पाणी टंचाईच्या काळात बोगद्यातील शुद्ध पाणी खेडला द्या!

खेडेकर यांनी मे महिन्यामध्ये ज्या पद्धतीने कोकणात पाणीटंचाई निर्माण होते त्यावेळेला शुद्ध पाण्याची नागरिकांना गरज असते या बोगद्यातील पाणी शुद्ध असून ते पाईपलाईन द्वारे खेडला द्यावे अशी परिस्थिती या बोगदात निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. करोडो रुपये या बोगद्याच्या कामावर खर्च झाले मात्र या बोगद्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाला राष्ट्रीय महामार्ग खात्याचे अधिकारी व ठेकेदार जबाबदार असून या सर्वांवर खातेनिहाय चौकशी होऊन गुन्हे दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# भारताच्या विजयानंतर रोहितच्या डोळ्यात तरळले विजयाश्रू

● भारत, प्रतिनिधी :

रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाने इंग्लंडचा पराभव करत २०२२ च्या उपांत्य फेरीतील पराभवाचा मोठा बदला घेतला. भारताने इंग्लंडचा ६८ धावांनी पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम फेरीत भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. इंग्लंडविरुद्धच्या या ऐतिहासिक विजयानंतर टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा भावूक झाला. रोहित ड्रेसिंग रूमबाहेर एकटाच बसला होता. विराट कोहली हात मिळवायला जाताच रोहितने हात डोळ्यावर घेतले आणि विराट त्याच्याशी काहीतरी बोलताना दिसला. रोहितचा ड्रेसिंग रूमबाहेरील हा फोटो आणि व्हीडिओ व्हायरल होत आहे.भारताच्या विजयानंतर भावुक झालेल्या



रोहित शर्माला विराटने सावरलं... रोहितच्या सामन्यानंतरच्या या व्हायरल फोटोमध्ये तो मान खाली घालून हात डोळ्यावर घेऊन बसल्याचे दिसत आहे. त्याच्या बाजूला विराट कोहली उभा आहे. जो त्याच्याशी बोलताना दिसत आहे. हा फोटो सोशल मीडियावर अनेकांनी शेअर केला आहे. तर चाहत्यांनी यावर कमेंट्सचा पाऊस पाडला असून वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. सोशल मीडियावर रोहित-विराटच्या या फोटोला करोडो चाहते लाइक करत आहेत. मैदानावर आणि मैदानाबाहेर दोघांमध्ये अनेकवेळा चांगलं बॉन्डिंग पाहायला मिळालं आहे. रोहितच्या या फोटोने २०२३ च्या वनडे वर्ल्ड कपचीही आठवण करून दिली. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंतिम पराभवानंतर तो रडताना दिसला होता. मात्र, तेव्हा दु:खाचे अश्रू होते आणि यावेळी आनंदाचे विजयाश्रू होते. रोहितचा हा फोटो व्हायरल झाला असून चाहतेही भावूक झाले आहेत.

इंग्लंडविरुद्धच्या या शानदार विजयानंतर रोहित शर्माच्या कर्णधारपदाचे कौतुक होत आहे. रोहितच्या नेतृत्त्वाखालील संघाने चमकदार कामगिरी करत १० वर्षांनंतर अंतिम फेरी गाठली आहे. याशिवाय गेल्या दोन सामन्यांमध्ये रोहितने सलग अर्धशतके झळकावत भारताला मोठी धावसंख्या रचण्याचा पाया घालून दिला. रोहितने इंग्लंडविरूद्धच्या सामन्यातही शानदार ५७ धावांची खेळी करत सूर्यासोबत चांगली भागीदारी रचली. जेणेकरून भारतीय संघ इंग्लंडला १७२ धावांचे आव्हान देऊ शकला. तर प्रत्युत्तरात अक्षर आणि कुलदीपच्या फिरकीसमोर इंग्लंडचा संघ १०३ धावा करत ऑल आऊट झाला.

# साताऱ्यात हृदय आणि फुफ्फुस प्रत्यारोपण सुविधा उपलब्ध

● सातारा , प्रतिनिधी :

हृदय आणि फुफुसाच्या अति गंभीर आजाराच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी साताऱ्यामध्ये दोन प्रमुख हॉस्पिटलमध्ये पुणे येथील डीपीयू सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल यांनी सुविधा उपलब्ध केली आहे. यामुळे सातारा व आसपासच्या रुग्णांना त्याचा लाभ होईल अशी माहिती हृदय प्रत्यारोपण व श्वसन विकार तज्ञ डॉ. राहुल केंद्रे व डॉ. संदीप अट्टावार, डॉ. समीर चौहान ,डॉ. संजय साठे, डॉ. अंशुमन गायकवाड यांनी सातारा येथे प्रीती एक्झिक्यूटिव्ह हॉटेल येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या वेळेला यशस्वीरित्या हृदय व फुफ्फुस प्रत्यारोपण झालेल्या रुग्ण प्राध्यापिका श्रीमती सुजाता पवार यांनी सविस्तर माहिती देऊन पत्रकारांच्या ज्ञानात भर घातली. मानवी अवयव




दान चळवळ उभी करण्यासाठी याचा फार उपयोग होणार आहे . तीन तासात अवयव प्रत्यारोपण करण्यात यश मिळालेले आहे .यासाठी ८० प्रकारच्या शारीरिक चाचण्या घेण्यात येतात .त्यानंतर रुग्णांना पुणे- मुंबई- हैदराबाद- चेन्नई येथे जावे लागत होते. आता खर्चाची बचत होणार असून रुग्णांना दिलासा मिळणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया खर्चिक असली तरी पैशापेक्षा जीव महत्त्वाचा आहे असे त्यांनी सांगितले. अवयव दान चळवळीमुळे एक व्यक्ती आपले अवयव दान करून सात रुग्णांचे प्राण वाचवू शकतो.

सध्या भारत देशामध्ये पाच लाख रुग्णांना विविध शारीरिक अवयवाची नितांत गरज आहे . तरी फक्त दोन किंवा तीन टक्के लोक अवयव दान करतात. त्यामुळे अवयव दान चळवळ ही व्यापक झाली पाहिजे. त्यामुळे अनेकांचे जीव वाचवण्यास मदत होणार आहे .सध्या डीपीयू सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटलच्या माध्यमातून श्वसन विकार तज्ञ, सर्जन व हृदय आणि फुफ्फुस प्रत्यारोपण सर्जन तसेच डी वाय पाटील विद्यापीठ येथील कुलपती डॉ. पी. डी. पाटील, डॉ. भाग्यश्री पी पाटील, डॉ. यशराज पाटील यांच्यासह डॉ. समीर चौहान ,डॉ. संजय साठे, डॉ. अंशुमन गायकवाड यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

तीन तासाच्या कालावधीमध्ये हृदय आणि फुफ्फुस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी केली जात आहे. वैद्यकीय क्षेत्रात क्रांती झाली असून अपघातानंतर आपल्या लाडक्या व्यक्तीचे अवयव दान केले तर दुसऱ्याचेही प्राण वाचवू शकतो. यासाठी समुपदेशक महत्त्वाचे आहे. विमानातून सुरत येथून तीन तासाने अवयव बसवून प्रत्यारोपण करून एका रुग्णाचे प्राण वाचवण्यात यश मिळाल्यामुळे ज्या रुग्णांनी अवयव दान केले त्यांचे कायम आठवण जिवंत राहत आहे.

# तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

● पुणे, प्रतिनिधी :

जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं आहे. ग्यानबा तुकारामाच्या गजरात अवघा मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालताच पालखीचा इनामदार वाड्यात पहिला मुक्काम असेल. तिथं रात्री आरती, मग कीर्तन होईल. लाखोंच्या संख्येने देहूत वारकरी दाखल झाले आहेत.

जगतगुरू संत तुकाराम महाजारांचा ३३९ वा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात पार पडला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक देहूत दाखल झाले होते. ग्यानबा तुकाराम आणि ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या गजराने अवघी देहू नगरी दुमदुमून



गेली होती. काल पासून देहूत गर्दी झाल्याचं पाहायला मिळालं. इंद्रायणी तिरी वैष्णवांचा मेळा भरला होता. सकाळी इनामदार वाड्यात जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. तिथून टाळ मृदंगच्या गजरात मुख्य मंदिरात पादुका आणण्यात आल्या. काही वेळातच अश्व आणि दिंड्याचे देऊळ वाड्यात आगमन झाले. काल्याचे कीर्तन झाल्यानंतर ठीक पावणे तीनच्या सुमारास तुकोबांच्या पालखीने ग्यानबा तुकारामाच्या गजरात पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. यावेळी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त होता. चोरीच्या घटना घडू नयेत म्हणून साध्या वेशात पोलीस पोलीस फिरत होते. चोरट्यांवर आणि संशयितांवर पोलोसांची नजर होती.

# जिओ मागोमाग एअरटेलचीही मोबाइल सेवा महागली!

● नवी मुंबई, प्रतिनिधी :

मोबाईलमध्ये कोणतेही काम करायचे असो; सगळयात आधी इंटरनेट आहे का हे तपासून पाहावे लागते. अगदी तिकीट बुक करण्यापासून ते एखाद्याला पैसे पाठविण्यापर्यंत अशा सगळ्या गोष्टींसाठी इंटरनेट उपलब्ध असणे गरजेचे ठरते. त्यामुळे विविध टेलिकॉम कंपन्या त्यांच्या ग्राहकांसाठी नवनवीन प्लॅन्स घेऊन येत असतात. अशातच काल रिलायन्स जिओ कंपनीने त्यांच्या मोबाइल सेवांचे दर वाढवून, नवीन यादी जाहीर केली. त्यापाठोपाठ आता एअरटेलनेही आपली सेवा महाग केल्याने ग्राहकांच्या खिशाला कात्री बसणार हे निश्चित झाले आहे.

एअरटेलने त्यांचे नवीन मोबाईल प्लॅन्स जाहीर केले आहेत. हे नवीन शुल्क दर Bharti Hexacom Ltd. सह सर्व ग्राहकांना लागू होतील. एअरटेलच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या सर्व योजनांसाठीचे




नवीन शुल्क दर ३ जुलैपासून लागू होणार आहेत. या मोबाईल प्लॅन्सच्या नवीन शुल्क दरांवर आपण एकदा नजर टाकू...

१.अनलिमिटेड व्हॉइस प्लॅन्स –

१. १७९ रुपयांच्या प्लॅनचे शुल्क १९९ रुपये करण्यात आले आहे. या प्लॅनमध्ये तुम्हाला २८ दिवसांची वैधता, २ जीबी डेटा, अनलिमिटेड कॉलिंग आणि दिवसाला १०० एसएमएस मिळणार आहेत.

२. ४५५ रुपयांच्या प्लॅनचे शुल्क ५०९ रुपये करण्यात आले आहे. या प्लॅनमध्ये तुम्हाला ८४ दिवसांची वैधता, ६ जीबी डेटा, अनलिमिटेड कॉलिंग आणि दिवसाला १०० एसएमएस दिले जातील.

३. १७९९ रुपयांच्या प्लॅनचे शुल्क १९९९ रुपये करण्यात आले आहे. या प्लॅनमध्ये तुम्हाला ३६५ दिवसांची वैधता, २ जीबी डेटा,अनलिमिटेड कॉलिंग आणि दिवसाला १०० एसएमएस दिले जातील.

२. डेली डेटा प्लॅन्स –

२८ दिवसांच्या डेली डेटा प्लॅन्सच्या शुल्कातही वाढ करण्यात आली आहे आणि ती खालीलप्रमाणे...

१. २६५ रुपयांच्या प्लॅनचे शुल्क २९९ रुपये करण्यात आले आहे. या प्लॅनमध्ये ग्राहकांना १ जीबी डेटा, अनलिमिटेड कॉलिंग आणि दिवसाला १०० एसएमएसचा लाभ मिळू शकतो.

२. २९९ रुपये प्लॅनच्या शुल्कात वाढ करून, ते ३४९ करण्यात आले आहे. या प्लॅनमध्ये ग्राहकांना १.५ जीबी डेटा, अनलिमिटेड कॉलिंग, दिवसाला १०० एसएमएस दिले जातील.

३. ३५९ रुपयांचा प्लॅन ४०९ रुपये करण्यात आला आहे. त्यामध्ये तुम्हाला २.५ जीबी डेटा, अनलिमिटेड कॉलिंग, दिवसाला १०० एसएमएस इत्यादी फायदे मिळतील. ४. ३९९ रुपये प्लॅनचे शुल्क ४४९ रुपये करण्यात आले आहे. त्यामध्ये ग्राहक ३ जीबी डेटा, अनलिमिटेड कॉलिंग आणि दिवसाला १०० एसएमएसचा लाभ घेऊ शकतात.

तसेच ५६ दिवसांसाठी वैध असणाऱ्या ४७९ रुपयांच्या प्लॅनमध्ये तुम्हाला १.५ जीबी डेटा, अनलिमिटेड कॉलिंग आणि दिवसाला १०० एसएमएस दिले जायचे. त्याची किंमत आता ५७९ रुपये करण्यात आली आहे. तसेच ५४९ रुपयांचा प्लॅन आता तुम्हाला ६४९ रुपयांमध्ये मिळेल; त्यात तुम्हाला २ जीबी डेटा, अनलिमिटेड कॉलिंग, १०० एसएमएसचा लाभ घेता येईल. तसेच ७१९ व ८३९ रुपयांच्या प्लॅनची किंमत आता ८५९ व ९७९ रुपये करण्यात आली आहे. तसेच वर्षभराचा म्हणजेच ३६५ दिवस वैध असणारा प्लॅन रिचार्ज करण्यासाठी आता तुम्हाला ३,५९९ रुपये मोजावे लागणार आहेत.

३. डेटा बूस्टर प्रीपेड प्लॅन्सवर सुद्धा नजर टाकूयात...

१९ रुपयांचा डेटा बूस्टर प्लॅन २२ रुपये, तर २९ रुपयांचा प्लॅनची किंमत ३२ रुपये करण्यात आली आहे आणि ६५ रुपयांचा प्लॅन आता तुम्हाला ७७ रुपयांमध्ये मिळणार आहे. एकूणच सर्व रिचार्ज प्लॅनचे नवीन दर पाहता ग्राहकांच्या खिशाला कात्री बसणार आहे असे दिसून येत आहे.